# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २०/०७/२०१८

## मा. विशेष महासभा

मा. विशेष महासभा सुचना क्र. ०३

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ______________________
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. विशेष महासभा गुरुवार दि. २६/०७/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०३ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

### मा. विशेष महासभा दि. २६/०७/२०१८ सभा सुचना क्र. ०३

### विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ३८ | दि. १८/०७/२०१८ रोजीच्या सभेतील ठराव क्र. २३ नुसार गठीत केलेल्या विशेष समित्यांवर तौलानीक संख्येप्रमाणे सदस्य घेणे. |
| ३९ | सुधारीत विकास योजना - मिरा भाईंदर महानगरपालिका<br>म.प्रा.व.न.र. अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये प्रारुप विकास योजना प्रसिध्द करणेस मुदतवाढ मिळणेबाबत. |
| ४० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते रुंदीकरण, फॅनिंग करणे इ. कामे करण्यासाठी मोबदला देणेबाबतचे धोरण निश्चित करणे. |
| ४१ | राष्ट्रीय महामार्गालगत मिरागाव, सिल्वर सरीता, क्रिष्णस्थळ, मुन्शी कम्पाऊंड, लक्ष्मी बाग, हाटकेश इ. भागातील पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणेबाबत. |
| ४२ | आजारी पक्षांच्या उपचारासाठी जागा उपलब्ध देणेबाबत. |
| ४३ | प.पु.डॉ. केशव बळीराम हेडगेवार भवन (स्थानिक संस्था कर कार्यालय) मधील काही जागा तहसिलदार कार्यालयाकरिता उपलब्ध करुन देणेबाबत. |
| ४४ | मिरा भाईदर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या बी.एस.यु.पी. योजनेतील कामे प्रधानमंत्री आवास योजनेत घेवून पूर्ण करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| ४५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आजी माजी सैनिकांसाठी विरंगुळा केंद्र तयार करणेबाबत. |
| ४६ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये गोरगरीबांवर मोफत उपचार करणेबाबत. |
| ४७ | महापालिका औषध फवारणी करणेकरिता ठेकेदारामार्फत कर्मचारी घेणेबाबत. |
| ४८ | फेरीवाला/ना फेरीवाला क्षेत्राचे पुर्नविलोकन करणे व धोरण ठरविणेबाबत केलेल्या ठरावांवर पुर्नविचार करणे. |
| ४९ | मा. महासभा दि. २६/०२/२०१८ रोजीच्या ठराव क्र.८४ अन्वये पारित केलेल्या जाहिरात विभागाच्या ठरावातील मुद्दा क्र.२ व ३ याबाबत पुर्न:विचार करुन निर्णय घेणे व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून नव्याने जाहिरात दर व नियोजन करणेकामी एजेन्सी नियुक्त करणेबाबत. |
| ५० | मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करणेबाबत प्रशासकिय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत. |
| ५१ | नगररचना विभागासाठी नव्याने पदे मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत. |
| ५२ | ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून मालमतेच्या अपसंपादनाबाबत महानगरपालिकेतील अधिकारी /कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे. |
| ५३ | वेदर शेड करीता भाडे आकारणीबाबत. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- २० जुलै, २०१८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि. २६/०७/२०१८

## नगरसचिव विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ३८ :-** **दि. १८/०७/२०१८ रोजीच्या सभेतील ठराव क्र. २३ नुसार गठीत केलेल्या विशेष समित्यांवर तौलानीक संख्येप्रमाणे सदस्य घेणे.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण 2 कलम 30(1) अन्वये महानगरपालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून [महिला व बालकल्याण समितीसह] विशेष समित्यांची नेमणूक करता येईल. अशा समित्यांनी महानगरपालिका त्यांना वेळोवेळी जे अनुदेश देईल ते पाळले पाहिजेत. त्या अनुषंगाने मा. महासभा दि. 18/07/2018, ठराव क्र. 23 अन्वये पुढील विशेष समित्या गठित करून विशेष समित्यांची सदस्य संख्या 9 (नऊ) इतकी निश्चित केलेली आहे.

1) पाणी पुरवठा व मलनि:सारण समिती
2) शिक्षण व समाज कल्याण व झोपडपट्टी सुधार, क्रिडा व सांस्कृतिक समिती
3) विधी व नियोजन समिती
4) आरोग्य परिरक्षण, वैद्यकिय सहाय्य, उद्यान व शहर सुशोभिकरण समिती

सदर विशेष समित्यांवर मा. महासभा दि. 18/07/2018, ठराव क्र. 23 नुसार 9 (नऊ) सदस्यांची तौलानिक संख्येप्रमाणे नेमणूक करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात पक्ष / गट नोंदणी केलेली असुन, दि. 10/10/2017 रोजीच्या पत्रान्वये मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी पक्ष / गटाचे तौलनिक संख्याबळ महानगरपालिकेस कळविले आहे. पक्ष / गट / आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| भारतीय जनता पार्टी | शिवसेना | काँग्रेस लोकशाही आघाडी |
|---|---|---|
| ६१ | २२ | १२ (१० + २) |

तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात विशेष समित्यांवर सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे होत आहे.

| अ. क्र. | पक्ष/गट/आघाडी | सरासरी | प्रस्तावीत सदस्य |
|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ६१ ÷ ९५ X ९ = ५.७७ | ६ |
| २ | शिवसेना | २२ ÷ ९५ X ९ = २.०८ | २ |
| ३ | काँग्रेस लोकशाही आघाडी | १२ ÷ ९५ X ९ = १.१३ | १ |

तरी वरीलप्रमाणे विशेष समित्यांवर सदस्य नेमणुक करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
21/7/18

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि.२६/०७/2018

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (३१) - सुधारित विकास योजना - मिरा भाईंदर महानगरपालिका म.प्रा.व न.र. अधिनियम, 1966 चे कलम 26 अन्वये प्रारुप विकास योजना प्रसिध्द करणेस मुदतवाढ मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विकास योजना भागशः दि.14/05/1997 रोजी मंजूर झाली असून, वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/01/2000 रोजी मंजूर झालेली आहे. तद्नंतर सदरच्या मंजूर विकास योजनेमधील MMRDA मार्फत तयार करण्यात आलेल्या व शासनाने मंजूर केलेल्या विकास योजनेचा भाग वगळून उर्वरीत भागाची विकास योजना सुधारित करणेकामी नियोजन प्राधिकरण तथा मिरा भाईंदर महानगरपालिकेने ठराव क्र. 76, दि.15/04/2015 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 23 व 38 नुसार इरादा जाहिर केला होता. तद्नंतर उक्त अधिनियमाचे कलम 24 अन्वये विभागीय सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवीमुंबई यांचे पुर्वमान्यतेने नगररचना अधिकारी म्हणून तत्कालीन नगररचनाकार, मिरा भाईंदर महानगरपालिका (प्रतिनियुक्ती) यांची नियोजन प्राधिकरणाने दि.10/03/2016 चे आदेशान्वये नेमणूक केली होती.

तत्कालीन नगररचना अधिकारी यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेच सुधारित विकास योजना खालील क्षेत्राचा उक्त अधिनियमाचे कलम 25 नुसार नकाशा तयार करुन दि.24/06/2016 रोजीचे पत्रान्वये नियोजन प्राधिकरणाकडे विहीत मुदतीत सादर केला.

उक्त क्षेत्राची प्रारुप विकास योजना, इरादा प्रसिध्दिपासून (महाराष्ट्र शासन राजपत्र प्रसिध्दी दि.26/12/2015) 2 वर्षाचे आत म्हणजेच दि.25/12/2017 या मुळ मुदतीत नियोजन प्राधिकरणाच्या मान्यतेने प्रसिध्द करणे आवश्यक होते. तथापि तत्कालीन नगररचनाकार तथा नगररचना अधिकारी यांना दि.10/10/2017 रोजी कार्यमुक्त केल्यानंतर प्रारुप सुधारित विकास योजना दि.07/02/2018 चे गोपनिय पत्रान्वये सादर केलेली आहे. सदर सादर केलेली प्रारुप विकास योजनेच्या प्रसिध्दीबाबत व वैधानिकतेबाबत नगररचना विभागाने मा. सहसंचालक यांचेकडे दि.14/02/2018 चे पत्रान्वये मार्गदर्शन अपेक्षिलेले होते. त्यावर विभागीय कार्यालयाकडून तत्कालीन नगररचनाकार तथा नगररचना अधिकारी कार्यमुक्त झाल्यानंतर त्या पदावर रुजू झालेल्या / कार्यभार असलेल्या नगररचनाकार यांनी नगररचना अधिकारी म्हणून काम करणे अपेक्षित असल्याचे कळविले आहे. तद्नंतर सुधारित विकास योजना प्रसिध्दीच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधानसभा अर्थसंल्कपिय अधिवेशनामध्ये तारांकित प्रश्न उपस्थित करणेत आला होता.

वरील सर्व बाबींच्या अनुषंगाने सुधारित विकास योजनेची कार्यवाही पुर्ण करुन ती प्रसिध्द करणेसाठी कोणती कार्यवाही करणे आवश्यक व वैधानिकदृष्ट्या योग्य राहील याबाबत शासनास मार्गदर्शन अपेक्षिलेले आहे. तथापि सदर बाबतीत अद्याप शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही. त्यामुळे तत्कालीन नगररचना अधिकारी यांनी गोपनिय पत्राव्दारे सादर केलेली प्रारुप सुधारित विकास योजना अद्यापही सीलबंद लिफाफ्यात ठेवणेत आली आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे प्रारुप विकास योजना इरादा प्रसिध्दीपासून 2 वर्षाच्या आत म्हणजेच दि:25/12/2017 पर्यंत प्रसिध्द झालेली नाही. करिता वैधानिकदृष्ट्या मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रारुप सुधारित विकास योजना प्रसिध्द करणेसाठी कलम 26 अन्वये मुदतवाढ मिळणेकरिता शासनाकडे संदर्भ करणे आवश्यक आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन 2011 च्या जनगणनेनुसारची लोकसंख्या 809378 इतकी असून कलम 26(तीन) नुसार एकूण सहा महिन्याची मुदतवाढ अनुज्ञेय होवू शकते. सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रारुप विकास योजना प्रसिध्दीबाबत येत असलेल्या वर नमुद केलेल्या वैधानिक अडचणीमुळे होत असलेला विलंब व शासनाकडून अपेक्षित असलेल्या मार्गदर्शनानुसार करावयाची कार्यवाही यासाठी लागणारा कालावधी विचारात घेता तसेच दरम्यानच्या कालावधीमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेची झालेल्या निवडणूकीच्या आचारसंहितेचा कालावधी व पदवीधर मतदान निवडणूकीचा आचारसंहितेचा कालावधी वगळून दि.25/12/2017 पासून पुढील सहा महिन्याकरिता प्रारुप विकास योजना प्रसिध्दीकरिता शासनास मुदतवाढ मिळणेकरिता प्रस्ताव सादर करणेकामी मान्यतेसाठी मा. महासभेपुढे गोषवारा सादर करणेत येत आहे.

(बालाजी खतगावकर)
आयुक्त
14/6/18
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि.14/6/2018 वेळ ...
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. 94
लिपिक
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा./विशेष महासभा दि.२६/०७/२०१८

## बांधकाम विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** ( ४० ) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते रूंदीकरण, फॅनिंग करणे इ. कामे करण्यासाठी मोबदला देणे बाबतचे धोरण निश्चित करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते रुंदीकरण करण्याकरीता कायदेशिर बाबींचा अभ्यास करून व कार्यपध्दतीचा मसुदा व धोरण तयार करणेसाठी खालील अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात आलेली आहे.

1) श्री. माधव कुसेकर - अतिरीक्त आयुक्त

2) श्री. शिवाजी बारकुंड - शहर अभियंता

3) श्री. दिपक पुजारी - उप आयुक्त, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग

4) श्री. दिपक खांबित - कार्यकारी अभियंता (बांधकाम)

5) हेमंत ठाकुर - नगररचनाकार

6) श्रीम. सई वडके - विधी अधिकारी

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास योजनेतील रस्ते, रुंदीकरण, फॅनिंग करणे, नविन रस्ते, आरक्षणामध्ये बाधित होणाऱ्या बाधितांना मोबदला देणेबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दतीचा व धोरणाचा मसुदा तयार करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची विकास योजना राज्य शासनाने 1997 मध्ये मंजुर केलेली असून सदर विकास योजनेची अंमलबजावणी 20 वर्षात करावयाची आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या व नागरीकरण पाहता सद्यस्थितीत शहरातील रस्ते विकास योजनेतील रुंदीप्रमाणे तयार करून वाहतुक रहदारीस वापरण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यानूसार शहरातील रस्ते रुंदीकरणाची मोहीम हाती घेण्यात आलेली आहे. शहरात रुंदीकरणासाठी हाती घेतलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे आहेत. रस्ता रुंदीकरण, नव्याने रस्ते तयार करणे, आरक्षणे विकसित करण्यासाठी सदर रस्ते व आरक्षणावरील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे हटविताना संबंधिताना योग्य मोबदला देण्याची आवश्यकता आहे.

सदरची बाधीत काही बांधकामे ग्रामपंचायत काळापासुन (सन 1985 पूर्वीपासून) किंवा नगर परिषद काळापासून अस्तित्वात आहेत. काही जणांकडे बांधकाम परवानगी नाही किंवा जमिनीचे कागदपत्र देखील नाहीत. सदर बांधकामे विकास योजनेतील रस्त्यानूसार रुंदीकरणात बाधीत होत असून बांधकामे तूटणाऱ्या व पर्यायी व्यवस्थेसाठी पात्र असलेल्या प्रकल्प बाधितांना मोबदला न दिल्यास ते बेघर होतील. त्यांचे आर्थिक नुकसान होईल व संबंधीत प्रकल्प बाधितांना हे न्यायालयात जावून प्रकरण न्यायप्रविष्ट होऊ शकते. त्यामूळे विकासाकामांना विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर प्रकल्प बांधितांना सहानभूती पुर्व विचार करुन विकास कामे लवकरात लवकर होण्याकरीता मोबदला देणे आवश्यक असून त्या संदर्भात धोरण निश्चित होणे आवश्यक आहे.

(2)

1) रहिवास :

अ) महानगरपालिका क्षेत्रातील विकास योजना रस्ते, रस्ते रूंदीकरण, नवीन रस्ते, आरक्षणाने बाधीत होणाऱ्या बाधीतांना रहिवास भागातील जी बांधकामे पुर्णपणे आरक्षणाने / विकास योजना रस्त्याने बाधीत होत आहेत अशा बांधकामा खालील जागेच्या खाजगी जागामालकास / कुलमुखत्यारपत्र धारकास मिरा भाईंदर महानगरपालिका मंजूर विकास नियंत्रण नियमावली परिशिष्ट 4, विनियम 33 मधील तरतूदीनूसार तसेच शासनाचे नगरविकास विभागाने निर्णय क्र. टिपीएस-1813 /3067 /प्र.क्र. 122 /12 /मनपा /कोकण /नवि-13 दि.29/01/2016 अन्वये निर्गमीत केलेल्या निर्णयानूसार विकास हक्क हस्तांतर प्रमाणपत्र देणे. तसेच जे बांधकाम अंशत: बाधीत होत आहे. त्यांना उर्वरीत जागेत त्यांच्या मूळ बांधकाम क्षेत्राएवढे बांधकाम करण्यास विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनूसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 264 नूसार परवानगी देणे.

ब) रस्ता रुंदीकरणात पूर्णत: बाधीत असलेल्या व पात्र प्रकल्प बाधितांना देण्यासाठी बांधकाम क्षेत्र उपलब्ध असल्यास 180 चौ.फुट. क्षेत्राचे (कारपेट) घर/सदनिका कायम स्वरुपी देणे.

2) वाणिज्य वापर :

अ) महानगरपालिका क्षेत्रातील विकास योजना रस्ते, रस्ते रूंदीकरण, नवीन रस्ते, आरक्षणाने बाधीत होणाऱ्या बाधीतांना वाणिज्य भागातील जी बांधकामे पुर्णपणे आरक्षणाने / विकास योजना रस्त्याने बाधीत होत आहेत अशा बांधकामा खालील जागेच्या खाजगी जागामालकास / कुलमुखत्यारपत्र धारकास मिरा भाईंदर महानगरपालिका मंजूर विकास नियंत्रण नियमावली परिशिष्ट 4, विनियम 33 मधील तरतूदीनूसार तसेच शासनाचे नगरविकास विभागाने निर्णय क्र. टिपीएस- 1813/ 3067/ प्र.क्र. 122/ 12/ मनपा/ कोकण/ नवि-13 दि.29/01/2016 अन्वये निर्गमीत केलेल्या निर्णयानूसार विकास हक्क हस्तांतर प्रमाणपत्र देणे. जे बांधकाम अंशत: बाधीत होत आहे. त्यांना उर्वरीत जागेत त्यांच्या मूळ बांधकाम क्षेत्राएवढे बांधकाम करण्यास विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनूसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 264 नूसार परवानगी देणे.

ब) सदर बाधीत दुकानदार यांना त्यांच्या क्षेत्राएवढे दुकान उपलब्ध करुन देणे.

3) औद्योगिक वसाहती :

अ) महानगरपालिका क्षेत्रातील विकास योजना रस्ते, रस्ते रूंदीकरण, नवीन रस्ते, आरक्षणाने बाधीत होणाऱ्या बाधीतांना औद्योगिक भागातील जी बांधकामे पुर्णपणे आरक्षणाने / विकास योजना रस्त्याने बाधीत होत आहेत अशा बांधकामा खालील जागेच्या खाजगी जागामालकास / कुलमुखत्यारपत्र धारकास मिरा भाईंदर महानगरपालिका मंजूर विकास नियंत्रण नियमावली परिशिष्ट 4, विनियम 33 मधील तरतूदीनूसार तसेच शासनाचे नगरविकास विभागाने निर्णय क्र.टिपीएस-1813/3067/प्र.क्र.122/12/मनपा/कोकण/नवि-13 दि.29/01/2016 अन्वये निर्गमीत केलेल्या निर्णयानूसार विकास हक्क हस्तांतर प्रमाणपत्र देणे. जे बांधकाम अंशत: बाधीत होत आहे. त्यांना उर्वरीत जागेत त्यांच्या मूळ बांधकाम क्षेत्राएवढे बांधकाम करण्यास विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 264 नूसार परवानगी देणे.

ब) सदर बाधीत औद्योगिक गाळेधारक यांना त्यांच्या क्षेत्राएवढे औद्योगिक गाळे उपलब्ध करुन देणे.

**4) जमिन :** जमिनीचा मोबदला महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे महापालिकेस प्रस्ताव सादर केल्यानंतर मोबदला देण्यात येईल.

5) सी.आर.झेड बाधीत जागेचा मोबदला शासनाच्या धोरणानूसार देणे.

6) वरील कार्यवाही व्यतिरीक्त रस्ता रुंदीकरणातील जागा ताब्यात घेण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 77 (1)(2)(3) व 78 (1)(2)(3) नूसार कार्यवाही करणे.

7) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 209, 210, 211, 212, 213 नूसार जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया करणे.

8) महानगरपालिकेने सर्व बाधितांना पर्यायी जागा हस्तांतर करताना कायदेशीर बाबी पार पाडण्यासाठी सदर जागा / घर किंवा सदनिकेची किंमत रु.100/- ठरविणे.

9) घर / दुकान / औद्योगिक गाळे धारक व जमिनमालक वेगवेगळे असल्यास घर / दुकान / औद्योगिक गाळेधारक यांना बाधित क्षेत्राएवढे घर / दुकान / औद्योगिक गाळा दिल्यानंतर जमिनमालक विकास हक्क प्रमाणपत्राची मागणी करणार आहेत. त्यावेळी सदर जागेवरील घर / दुकान / औद्योगिक गाळाधारकांना दिलेला मोबदला वगळुन विकास हक्क प्रमाणपत्र जमीन मालकांना देणे योग्य राहील. अन्यथा मनपाचे दुहेरी नुकसान होईल.

10) विकास हक्क प्रमाणपत्र प्रदान करतेवेळीच सदर जागा तात्काळ मनपाच्या नावे सात बारा उतारा मिळकत पत्रिकेवर करून घेण्याबाबत कायदेशीर तरतूद अवलंबिणे गरजेचे आहे.

11) जागा ताब्यात आल्यानंतर तिचा तात्काळ वापर / संरक्षण करण्यात येईल.

<u>12) रस्ता रुंदीकरण / आरक्षणांना बाधित बांधकामांना मोबदला देणे बाबत निकष / पात्रतेच्या अटी शर्ती</u>

1) जागेच्या मोबदल्याबाबत

महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 126 नूसार कार्यवाही करण्यात यावी.

2) सदरचे बांधकाम हे दि.1/1/2011 पूर्वीचे बांधकाम असल्याचा पुरावा असणे आवश्यक आहे.

<u>विवरणपत्र "अ"</u>

1) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सन 2011 यापुर्वी अथवा त्यापूर्वीच्या प्रकाशित झालेल्या अंतीम मतदार यादीचा प्रमाणित उतार.

2) त्या झोपडीत प्राधिकृत वीज कंपनीने वीज जोडणी दिल्याची कागदपत्रे/अभिलेख/देयक

3) झोपडीची महानगरपालिका /नगरपरिषदेने मालमत्ता कर आकारणी केल्याचा पुरावा.

<u>विवरणपत्र "ब"</u>

1) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त करण्यात आलेल्या डोमिसाईल (वास्तव्याचा पुरावा) सर्टिफिकेट

2) झोपडीला महानगरपालिका/नगरपालिकेकडून जलजोडनी दिल्याचा पुरावा/देयक.

वरील प्रमाणे संबंधित बांधकामाचे कमीत कमी दोन पुरावे आवश्यक आहेत.

वरीलप्रमाणे मोबदला देणेबाबत व रस्ते रुंदीकरण, फॅनिंग करणे, नवीन रस्ते आरक्षणातील बाधीत होणाऱ्या जागेच्या बाधीतांना मोबदला देणेसाठीचे धोरणास मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-1/DK/MS/2018-19/MG-1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि. २६|०७|२०१८

## <u>बांधकाम विभाग</u>

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** ( ४२ ):- आजारी पक्षांच्या उपचारासाठी जागा उपलब्ध करुन देणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रात महानगरपालिकेचे आजारी पशु-पक्षी यांच्यावर उपचार करण्यासाठी रुग्णालय उपलब्ध नाही. विविध संस्थामार्फत आजारी पक्षांच्या उपचारासाठी महानगरपालिकेकडे जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आली असून सदर जागेत सदर संस्थामार्फत स्वखर्चाने आजारी पक्षांवर उपचार केला जाणार आहे. मिरा भाईंदर महानगरपालिके मार्फत भाईंदर पश्चिम डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्त्यालगत असलेल्या फायर स्टेशनच्या आवारात आजारी पक्षांच्या उपचारासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली होती, तथापी सदर जागेत इमातीची पुर्न बांधणी अंतर्गत सदर शेड काढण्यात येणार आहे. त्यामूळे मागणीनूसार नविन जागा उपलब्ध करुन द्यावी लागणार आहे.

सदर जागा आरक्षण क्र. 232 शॉपिंग सेंटर या समावेशक आरक्षणात विकासकाकडून बांधून मिळालेल्या इमारतीच्या तळमजल्यावर तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करुन देता येऊ शकेल. सदर जागेची मालकी महानगरपालिकेची राहील. सदर प्रस्तावास मान्यता देण्यास शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
१८/७/१८

PC-6/18-19/DK/MG-1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि.२६/०७/२०१८

## बांधकाम विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ( ४४ ) :-** मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या बी.एस.यु.पी. योजनेतील कामे प्रधानमंत्री आवास योजनेत घेऊन पुर्ण करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या बी.एस.यु.पी. योजनेबाबत खालीलप्रमाणे विस्तृत माहिती सादर करण्यात येत आहे.

१) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत "शहरी गरींबांना मुलभूत सुविधा पुरविणे" (BSUP) या उपकार्यक्रम अंमलबजावणी बाबत महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग यांनी दि. २५ जून २००७ शासन निर्णय अन्वये सुचना निर्गमित केल्या आहेत.

**राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचना**

सन २००१ च्या जनगणेनुसार देशात सुमारे २८५.३५ दशलक्ष म्हणजे देशाच्या एकुण लोकसंखेच्या २७.८ टक्के लोक शहरात राहात आहेत. स्वातंत्र्यानंतर देशाच्या लोकसंखेत तिप्पट वाढ झालेली असुन शहरी भागातील लोकसंखेत पाचपट वाढ करणा-या गरीब जनतेच्या लोकसंख्येत सुध्दा वाढ झालेली आहे. सन२००१ च्या जनगणेनुसार देशातील झोपडपट्टीवासीयांची एकुण लोकसंख्या ६१.८ दशलक्ष इतकी झालेली इतकी झालेली आहे.

शहरातील झोपड्पट्टीवासीयांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे शहरातील मुलभुत सोयी व सुविधावर अतोनात ताण पडत आहे. यानुसार केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत "शहरी गरींबांना मुलभूत सुविधा पुरविणे" (BSUP) या उपकार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

**कार्यक्रमाची उदिष्ठ्ये**

१)कार्यक्रमात समाविष्ट असलेल्या सहरातील गरिब जनतेसाठी पुरविण्यात येणा-या मुलभुत सुविधाचा एकात्मीकत विकास करण्यावर लक्ष केंद्रीत करणे.

२)शिक्षण,आरोग्य,व सामाजिक सुरक्षा पुरविणे.

३)मालमत्तेची निर्मीती व मालमत्तेचे व्यवस्थापन.

४)आवश्यक तेवढ्या निधीची गुंतवणुक करणे.

५)नागरी सुविधा व सोयी पुरविणे.

**कार्यक्रमाचा कालावधी.**

सन.-२००५-२००६ पासुन ७ वर्ष.( प्रकल्पास मुदतवाढ ३१ मार्च २०१७)

**निधी उपलब्धता**

केंद्र शासनाचा वाटा एकुण प्रकल्प खर्चाच्या ५०%

मागासवर्गिय/ सर्वसाधारण १० ते १२ %

उर्वरीत राज्य शासन व स्थानीक स्वराज्य संस्था.

अंमलबजावणी रुपरेषा

दि.०१/०१/१९९५ च्या लाभार्थीना प्राधान्याने सहभागी करुन घेणे.

प्रस्तावाची अंमलबजावणी अ) निव्वळ पायाभुत सुविधा पुरविणे ब)गहनिर्माण प्रकल्प

लाभार्थ्यांचे अंशदान वसुल करण्याची जबाबदारी स्थानीक स्वराज्य संस्थाची असेल.

निवासी झोपडीधारकांना किमान २६९ चा.फु. बांधकाम क्षत्रफळाइतका (२२५ चा.फु.चटई क्षत्र) गाळा देण्यात येईल.

शासकीय जमिनीवरिल झोपड्याच्या जागेवर घरे बांधण्यासाठी अकषीक परवानगी आवश्यक नाही.

नोंदणी फी पुर्णपणे माफ करणे.

२) मिरा-भाईंदर महानगरपालिकेने सदर प्रकल्प राबविणेस मा. महासभा दि. २०/११/२००९ ठराव क्र. ३६ अन्वये प्रशासकिय व आर्थिक मान्यता प्रदान केली.

३) त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नागरी पुर्नरुत्थान अभियानांतर्गत "शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे" हा उपक्रम हाती घेण्याचे ठरविले. महानगरपालिका क्षेत्रातील बहुताशः झोपडया या खाजगी जागेवर व सी.आर.झेड ने बाधीत असल्याने शासकीय जागेवर वसलेल्या जनतानगर व काशी चर्च या फक्त दोनच झोपडपट्टया अस्तित्वात होत्या. त्यामुळे सदर दोन झोपडपट्टयांची निवड सदर उपक्रमासाठी करण्यात आली.

४) मा. स्थायी समिती ठराव क्र. ११८ दि. १७/०२/२००९ नुसार दि.२६/०९/२००९ च्या कार्यादेशानुसार मे. पुनित आर्किटेक्ट, ठाणे यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणुक करण्यात आली. सदर सल्लागारामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन म्हाडा मार्फत केंद्रशासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला. सदर प्रकल्प हा जिल्हाधिकारी यांच्या मालकिच्या जागेवर असल्याचे नमुद करुनच प्रकल्प सादर करण्यात आला होता.

सदर रु. २७९.५५ कोटी किंमतीच्या प्रकल्पास दि. ११/११/२००९ रोजी केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाली. सदर योजनेचा मंजूर वित्तीय आकृती बंध खालील प्रमाणे होता.

| अ.क्र. | तपशिल | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | मनपा हिस्सा | लाभार्थी हिस्सा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | घराची किंमत | ६५२१.५९ (५० %) | ३९१२.९६ (३० %) | ११७३.८८ (९%) | १४३४.७५ (११ %) | १३०४३.१८ |
| २) | मुलभूत सुविधा | ४९०८.४० (५०%) | रु.२४५४.१९ (२५ %) | २४५४.१९ (२५ %) | - | ९८१६.७८ |
| ३) | संक्रमण शिबीर | - | १४८८.९६ (५० %) | १०६५.०८ (५० %) | - | ५०९५.४४ |
| ४) | इतर | - | - | २५४१.४० | - | |
| | एकूण | ११४२९.९९ | ७८५६.१२ | ७२३४.५६ | १४३४.७५ | २७९५५.४२ |

**प्रकल्पाचे उपांगे खालील प्रमाणे आहे.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | एकूण झोपडपट्टी | - | दोन (१) जनतानगर<br>(२) काशीचर्च |
| २ | लाभार्थ्यांची संख्या | - | ४१३६ (१) जनतानगर ३६६५<br>(२) काशीचर्च ४७१ |
| ३ | पुरविण्यात येणाऱ्या सदानिकेचे स्वरुप | - | सदनिका 1 BHK स्वरुपाची असूनत्यामध्ये Living in Room, Bedroom, Kitchen, W.C. Bath, Passage, Balcony. यांचा समावेश आहे |
| ४ | चटई क्षेत्र | - | २५ चौ.मी (२६९ चौ.फुट)/प्रति लाभार्थी |
| ५ | पुरविण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा | | i. अंतर्गत रस्ते<br>ii. पाणीपुरवठा व मलनिःस्सारण<br>iii. पथदिवे<br>iv. बालवाडी (७)<br>v. समाजमंदिर (६) |
| ६ | घराच्या किंमती | | |
| | प्रत्यक्ष घराची किंमत | | रु. ३.४६ लक्ष प्रती घर |
| | पायाभूत सुविधा किंमत | - | रु. ३.३० लक्ष प्रती घर |
| | एकूण घराची किंमत (पायाभूत सुविधांसह) | - | रु. ६.७६ लक्ष प्रती घर |

| अ.क्र. | निधीचा स्त्रोत | केंद्र शासना प्रमाणे मंजूर निधी | प्राप्त निधी | |
|---|---|---|---|---|
| | | | दिनांक | रक्कम |
| १ | केंद्र शासन | ११,४२९.९९ | नोव्हे.२०१० | २८५६.०० |
| | | | जुले २०१५ | ११७०.०८ |
| २ | राज्य शासन | ७,८५६.१२ | एप्रिल २०११ | १९६४.०३ |
| | | | जुले २०१५ | ८०४.०३ |
| ३ | मिरा भाईंदर मनपा | ७,२३४.५६ | - | - |
| ४ | लाभार्थी | १,४३४.७५ | - | - |
| | **एकूण** | **२७,९५५.४२** | | **६७९४.१४** |

सदर योजनेकरीता केंद्र व राज्य शासनाकडून रू. ६७.९४ कोटी एवढा निधी महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. आजपावेतो रक्कम रू. ७६.३३ कोटी एवढा खर्च महानगरपालिकेमार्फत पुढील प्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

**प्राप्त अनुदान व झालेला खर्च**

| अ.क्र. | केंद्रशासन व राज्य शासन यांच्याकडून आलेला निधी | इमारत क्र.01 चे काम पुर्ण व त्यावरील झालेला खर्च | इमारत क्र.01 सोडून प्रकल्पावरील झालेला खर्च | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | रु. 67.94 कोटी | रु.8.34 कोटी | रु.63.74 कोटी | रू. ७२.०८ कोटी |

**अंमलबजावणी यंत्रणा.**

**१)महानगरपालिका**

सदर प्रकल्पासाठी महाराष्ट शासन, केंद्र शासन यांच्याशी समन्वय साधुन प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पी.एम.सी) व पॅकेजनिहाय ठेकेदार यांच्याकडुन सदर प्रकल्पातील काम करुन घेणे,पाठपुरावा करणे व शासनास वेळोवेळी अहवाल पाठविणे.

**२)प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार**

सदर प्रकल्पासाठी मे. पुनीत आर्किटेक्ट यांची सल्लागार म्हणुन नेमणुक करण्यात आलेली असुन त्यांची खालीलप्रमाणे जबाबदारी आहे.

अ)सविस्तर प्रकल्प अहवाल, अंदाजपत्रक तयार करणे, राज्य व केंद्र शासनाची मान्यता घेणे.

ब)सविस्तर निविदा फॉर्म, कागदपत्र तयार करणे, सुपरव्हिजन करणे.

**३)प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पी.एम.सी)**

सदर प्रकल्पाच्या तांत्रिक बाबी तपासणीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मे. टेक्नो कंन्सल्टंट, नवी-मुंबई यांची विहीत कार्यवाही करून मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.१३९, दि.२५/०२/२०१० च्या मंजुरीने दि. २६/०३/२०१० रोजीच्या कार्यादेशान्वये नेमणुक करण्यात आली आहे. त्यांची खालीलप्रमाणे जबाबदारी आहे.

अ)प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार

ब)प्रकल्प अंतर्गत तांत्रिक सल्ला देणे, कागदपत्र छाणणी, प्रकल्पाअंतर्गत तांत्रिक व इतर व्यवस्थापन करणे, सुपरव्हिजन करणे.

**४)प्रकल्पातील कंत्राटदार**

सदर कामाच्या निविदा मागवुन मा. स्थायी समिती सभा दि.०५/०८/२०१० ठराव क्र. ३६ अन्वये कंत्राटदार यांना खालील प्रमाणे कार्यादेश देण्यात आले. प्रकल्प जलद गतीने पूर्ण करण्याच्या उद्दीष्टाने प्रकल्पाचे काम चार पॅकेजमध्ये विभागून खालीलप्रमाणे देण्यात आले आहे.

(रुपये कोटीत)

| पॅकेज | नेमलेला कंत्राटदार | निविदा किंमत (कोटीत) | सदनिका | कार्यादेश व दिनांक |
|---|---|---|---|---|
| जनता नगर जे १ | मे. शायनो कार्पोरेशन - टोस्कॉनो इन्फ्रास्टक्चर प्रा.लि. (जे.व्ही) | १०६.७३ | १३३६ | दि.२८/१२/२०१० |
| जनता नगर जे २ | मे. डिव्हीनिटी (जे.व्ही) | ९३.३० | ११५६ | दि.२४/११/२०११ |
| जनता नगर जे ३ | मे.श्रीजी कन्ट्रक्शन व बिटकॉन इंडीया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हर्ल्पस प्रा.लि. (जे.व्ही) | ९३.२८ | ११७३ | दि.२७/१२/२०१० |
| काशीचर्च | मे. डी. के. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,सुमेर कार्पोरेशन, एस.व्ही. जिवानी, स्ट्रेक्रिट. लि. (जे.व्ही) | ३७.२४ | ४७१ | दि.२८/१२/२०१० |

**इतर विभागाची परवानगी**

**१) पर्यावरण विभाग**

सदर प्रकल्पास पर्यावरणाच्या दृष्टीने पर्यावरण विभागाची आवश्यकता असल्याने सदर विभागाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करुन दि.२५/०१/२०११ रोजी मान्यता प्राप्त करून घेण्यात आली.सदर मान्यता ५ वर्षासाठी होती. पर्यावरण विभागाची वाढीव मान्यता प्राप्त नसल्याने प्रकल्पाचे काम सुरु ठेवता येणार नाही.

**२) राष्टीय महामार्ग प्राधिकरण**

सदर प्रकल्पास दि.२८/०७/२०१० च्या पत्रान्वये राष्टीय महामार्ग प्राधिकरण परवानगी प्राप्त आहे.

**३) जमीन विक्रीची परवानगी**

सदर प्रकल्पामध्ये शासनाच्या निकषानुसार महानगरपालिकेस हिश्याची रक्कम रुपये ७२.३४ कोटी उभारावयाची होती. तसेच प्रकल्प वर्धनक्षम (Viable) होण्यासाठी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.टिपीएस ११०७/अनौ.३६/प्र.क्र.१३५/०८/नवि-५ दि. २४ डिसेंबर २००८ मधील तरतुदीनुसार २.५ चटईक्षेत्र निर्देशांक लागू करुन त्यातील २५ %चटईक्षेत्र विक्री घटकासाठी वापरुन अतिरिक्त निधीची उभारणी करण्यात येणार होती. त्यानुसार महानगरपालिकेच्या प्रस्तावास मा. मुख्य अभियंता म्हाडा यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक जा.क्र.२/उमुअ/ जेएनएनयुआरएम/६८९/१० दि.३०/०९/२०१० अन्वये मंजुरी दिलेली असून जमीन विक्रीची परवानगी दिलेली आहे.

**शासनाची जबाबदारी**

सदर प्रकल्पातील कामाचा पाठपुरावा करणे. स्थानिक स्वराज्य संस्थाना सदर प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन देणे. सदर प्रकल्प कालमर्यादीत असल्यामुळे कामासाठी पाठपुरावा करणे. प्रकल्पातील कामाबाबत महाराष्ट शासन व केंद्रशासनास अहवाल देणे.

**महानगरपालिकेची जबाबदारी**

पॅकेजनिहाय ठेकेदार यांच्याकडुन सदर प्रकल्पातील इमारतीचे बांधकामाचे काम पुर्ण करुन घेणे,पाठपुरावा करणे व शासनास वेळोवेळी अहवाल पाठविणे.

**कंत्राटदाराची जबाबदारी**

निवीदा मंजुरी नुसार प्रकल्पातील पॅकेजनिहाय इमारतीचे काम पुर्ण करणे, प्रकल्पातील प्रत्यक्ष जागेवरील झोपड्या हटविणे, संक्रमण शिबीराचे बांधकाम करणे,लाभार्थीना संक्रमण शिबीरामध्ये स्थलांतरीत करणे, भाडेतत्वावरील लाभार्थीना भाडेचे धनादेश देऊन स्थलांतरीत करणे.

**म्हाडाची भुमिका**

महाराष्ट शासनाने बि.एस.यु.पी प्रकल्पासाठी म्हाडाची नोडल एजन्सी म्हणुन नियुक्ती केलेली आहे. सदर प्रकल्पातील कामाचा आढावा घेणे, निधी वितरण करणे व केंद्रशासनास प्रकल्पाच्या कामाचा अहवाल पाठविणे.

**शासनाचे मार्गदर्शन**

**Cost Escalation**

(गहनिर्माण विभागाचे दि.११/०६/२०१५ चे पत्र)

शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविणे या कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनानुसार प्रकल्पात अनुज्ञेय नाही. तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा व त्यासाठी महानगरपालिकेस कराव्या लागणा-या अतिरीक्त खर्चाची कोणतीही रक्कम बी.एस.यु.पी.कार्यक्रमातुन केंद्र व राज्यशासन देऊ शकणार नाही.

**प्रकल्पास मुदतवाढ**

(गहनिर्माण विभागाचे दि.१९/११/२०१६ चे पत्र)

केंद्र शासनाच्या सुचनेनुसार बी.एस.यु.पी. प्रकल्प विहीत कालावधीत पुर्ण करणे आवश्यक आहे. सबब आपली मुदतवाढीची विनंती अमान्य करण्यात येत असुन सदर प्रकल्प वेळेत पुर्ण करण्याची दक्षता घ्यावी.

(गहनिर्माण विभागाचे दि.१७/११/२०१६ चे पत्र)

प्रकल्पाच्या मुदतवाढीसाठी आपण केलेली विनंती मान्य करता येणार नाही. सबब सदर प्रकल्प वेळेत पुर्ण करण्याची दक्षता घ्यावी.सबब दि. १९/११/२०१६ च्या पत्रान्वये देण्यात आलेले उत्तर अंतिम असुन त्यामध्ये निश्चीत केलेला प्रकल्प पुर्ण करणे केंद्र शासनाच्या कार्यक्रमानुसार आवश्यक आहे.

सदर प्रकल्पास ३१ मार्च २०१७ पर्यत केंद्र शासनाने मुदवाढ दिलेली होती. प्रकल्पातील इमारतीचे काम पाहता इमारतीचे काम पुर्ण करण्यास पुढील २-३ वर्षाचा कालावधी लागणार आहे. परंतु शासनाने प्रकल्पास मुदतवाढ दिलेली नाही. सदर प्रकल्पाबाबत मा. मुख्यमंत्री ,महाराष्ट राज्य यानी दि.१४ जुन २०१७ रोजी सदर प्रकल्पाचे काम प्रधानमंत्री आवास योजनेमधुन पुर्ण करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

**CSMC बैठक**

केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी दारिद्रय निर्मुलन मंत्रालयाद्वारे दि. २०/०३/२०१५ रोजीच्या सी.एस.एम.सी.च्या बैठकीमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बी.एस.यु.पी. प्रकल्पाबाबत चर्चा करण्यात आली होती. सदर बैठकीत त्यावेळी सुरू असलेल्या २३५१ घरकुल पुर्ण करणेबाबत निर्णय घेण्यात आला असून योजना बंद झाल्यामुळे निधी मिरा भाईंदर महानगरपालिकेस मिळणार नाही. तसेच उर्वरित १७८५ घरकुलांसाठी महानगरपालिकेने स्वतः च्या निधीतुन खर्च करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर प्रकल्पामध्ये मुळ मंजुरीनुसार G+8 च्या इमारती (४१३६ सदनिका) बांधण्यात येणार होत्या. परंतु प्रकल्प Insitu असल्यामुळे लाभार्थीना स्थलांतरीत करुन इमारतीच्या कामास सुरुवात करण्यास विलंब झाला आहे. सदर प्रकल्पाच्या ठिकाणी उंच डोंगर असल्यामुळे सदर डोंगराची खोदाई करण्यास विलंब झाला आहे. सदर प्रकल्प २३५१ सदनिकासाठी सिमीत केल्यामुळे स्थलांतरीत केल्या लाभार्थीना प्राधाण्याने सामावुन घेण्यासाठी G+16 च्या इमारती बांधण्याचा मा. महासभा दि.१३/०७/२०१५ ठराव क्र.३२ नुसार घेण्यात आलेला आहे. प्रकल्पामध्ये मुळ मंजुरीनुसार G+8 च्या दोन इमारतीचे काम सुरु आहे.उर्वरीत इमारती G+16 बाबतचे सुधारीत नकाशांना नगररचना विभागाची मंजुरी प्राप्त आहे.

**संक्रमण म्हणजे भाडे व शिफ्टींग**

मा. महासभा, मा. स्थायी समिती सभा तसेच सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये संक्रमण शिबीराची व्यवस्था केलेल आहे.

संक्रमणमध्ये भाडेचे लाभार्थी व शिफ्टींगचे लाभार्थी या दोन्ही चा समावेश आहे. सदर ठरावात २ वर्षाच्या भाडेची तरतुद असली तरी पुढील वाढीव कालावधीसाठी सुध्दा प्रतिपुर्ती करावी लागणार आहे.

१) मिरा-भाईंदर महानगरपालिका राबवित असलेला बी एस यु पी प्रकल्प हा In situ प्रकारात मोडत असल्याने जोपर्यंत लाभार्थ्यांसाठी तात्पुरत्या निवासाची व्यवस्था होत नाही तोपर्यंत प्रत्यक्ष इमारत बांधणीच्या कामास सुरुवात करता येत नाही. प्रकल्प प्रस्तावात यासाठी लाभार्थ्यांना रु. ३०००/- प्रति माह प्रमाणे दोन वर्षासाठी घर भाडे देण्याची तरतुद आहे. निविदा बोलावितेवेळी ५०% लाभार्थ्यांसाठी संक्रमण शिबिर व ५०% लाभार्थ्यांसाठी घरभाडे देणे असे प्रस्तावित आहे.

२) काशीमिरा / मिरा रोड परिसरात एवढया मोठया संखेने व तेही ज्यांना मिळणाऱ्या भाडयाच्या रक्कमेत घर मिळणे दुरापस्त वाटत असल्याने संक्रमण शिबिर हाच पर्याय उरत असल्याने १३१७ संक्रमण खोल्या

बांधण्यात आलेल्या आहेत.

३) आतापर्यंत भाडेतत्वावर व संक्रमण शिबीरात स्थलांतर केलेल्या लाभार्थीच्या २०४२ झोपड्या तोडण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | संक्रमण शिबीर संख्या | परवानगी दिनांक |
|---|---|---|---|
| १ | घोडबंदर आरक्षण, क्र. ३२६ (अ) | ४८७ | दि. १४/०३/२०१२ |
| २ | मौजे काशी, सिल्व्हर सरीता | २१६ | दि. २२/११/२०१२ |
| ३ | मौजे घोडबंदर, आरक्षण क्र. ३२६ (ब) | १०१५ | दि. ०८/०५/२०१३ |

**प्रकल्पाची किंमत**

बी.एस.यु.पी.योजनेमधील इमारत बांधकामास अपेक्षीत खर्च 1,81,863 X 27,986.40 चौ.मी.=508.96 कोटी एवढा खर्च अपेक्षीत आहे. बी.एस.यु.पी.प्रकल्पाच्या दरानुसार 24.94 कोटी एवढा खर्च वास्तुविशारद, आर.सी.सी.तंज्ञ व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार या बाबीसाठी होणार असून एकूण प्रकल्पाची किंमत 533.91 कोटी एवढी होत आहे.

| झालेल्या कामाचे मुल्याकन | आतापर्यंत झालेला खर्च | कंत्राटदारास द्यावयाची रक्कम |
|---|---|---|
| रु.82.64 कोटी. | 72.08 कोटी | 10.56 कोटी |

**मा.विशेष महासभा (दि.१३/०७/२०१५ठराव क्र.३२)**

१) सदर योजना केंद्र शासनाच्या मुळ मंजुरी नुसार ४१३६ सदनिका करीता प्रकल्प राबवून प्रकल्प पूर्ण करण्यात यावा.

२) बी.एस.यु.पी. प्रकल्प धोरणानुसार बी.एस.यु.पी. योजना वर्धनक्षम करण्याकरीता शासन निर्णयातील तरतूदीनुसार २.५ चटईक्षेत्र निर्देशांक वापरण्याची मुभा मनपास प्रदान करण्यात आलेली आहे. २.५ चटईक्षेत्र निर्देशांक लागू केल्यानंतर त्यामधील प्रथमतः १५ % च.क्षे.नि विक्री घटकाकरीता वापरण्याचे अधिकार मनपास असून वाढीव १०% च.क्षे.नि. (विक्री घटकाकरीता कमाल २५ %) घटकाकरीता वापरण्यास मा. उपाध्यक्ष म्हाडा यांच्या परवानगीने मुभा देण्यात आलेली आहे. तथापी सदर प्रकल्प पूर्ण करण्यास २५% व्यतिरीक्त २१% वाणिज्य वापराची परवानगी मिळून एकूण ४६% वाणिज्य वापराची परवानगी शासनाकडुन घ्यावी असा ठराव पारीत करण्यात आला आहे.

३) संक्रमण शिबीराची व्यवस्था व रेंटल हाऊसींगच्या सदनिकामध्ये लाभार्थीना स्थलांतरीत करण्याची जबाबदारी बाबत खालील प्रमाणे नमुद आहे.

४) मुळ निवीदेतील अटी शर्तीनुसार सदर लाभार्थीना भाडे देण्याची जबाबदारी संबधीत ठेकेदाराची असुन सदर भाडे देणेबाबत ठेकेदारास तोंडी व पत्रान्वये सुचीत केलेले आहे.

वरील ठरावानुसार कंत्राटदाराना सुधारीत कार्यादेश देण्यात आलेले होते.

**अतिरिक्त वाणिज्य वापरासाठी शासनास प्रस्ताव**

वरीलप्रमाणे सदर योजना राबविताना आलेल्या अडचणी, त्यामुळे कामास झालेला विलंब व काम पूर्ण करण्यासाठी लागणारा निधी सदर योजनेस पात्र लाभार्थ्यांच्या झोपड्या तोडून त्यांना स्थलांतर केल्याने त्याचे पुर्नवसन करणे, याबाबत आढावा घेतला असता सदर योजना ही महानगरपालिकेस निधी उपलब्ध करुन देऊन पूर्ण करावा लागणार आहे. शासनाकडून सदर योजना २३५१ सदनिकासाठी सिमीत केल्याने शासन अनुदान देखील मंजूरीपेक्षा कमी मिळणार आहे. त्यामुळे मंजुर ४१३६ सदनिका बांधण्याच्या दृष्टीने शासनाकडून विहीत मर्यादेपेक्षा जादा चटईक्षेत्र वाणीज्य वापरासाठी मंजुर करुन घ्यावा लागेल. सदर

योजनेच्या मंजुर नकाशात बदल करुन ४१३६ सदनिका बांधण्यासाठी शासन अनुदान वगळता इत्तर निधी वाणीज्य वापरातुन उभा करावा लागेल. त्यासाठी शासनाकडे अतिरिक्त ५० % वाणिज्य वापरासाठी परवानगी मागितलेली होती सदर प्रस्तावास मान्यता मिळालेली नाही.

**विलंबाची कारणे.**

१) सदर प्रकल्प हा सरकारी जागेवर करावयाचा असल्याने जागा मागणीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे दि.३१/०८/२००९ रोजी सादर करण्यात आला. सदर जागा ताब्यात मिळविण्यासाठी मा. जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, मा. विभागीय आयुक्त कोकण भवन, महसुल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे पाठपुरावा व पत्रव्यवहार केल्यानंतर सदर जागेचा आगाऊ ताबा मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी महानगरपालिकेस दि.०५/०४/२०११ रोजी दिला व तद्नंतर शासनाची जागा हस्तांतरणास दि.१६/११/२०११ रोजी अंतिम मान्यता प्राप्त झाली.

२) मिरा-भाईंदर महानगरपालिका राबवित असलेला बी एस यु पी प्रकल्प हा In situ प्रकारात मोडत असल्याने जोपर्यंत लाभार्थ्यांसाठी तात्पुरत्या निवासाची व्यवस्था होत नाही तोपर्यंत प्रत्यक्ष इमारत बांधणीच्या कामास सुरवात करता येत नाही. प्रकल्प प्रस्तावात यासाठी लाभार्थ्यांना रु. ३०००/- प्रति माह प्रमाणे दोन वर्षासाठी घरभाडे देण्याची तरतुद आहे. निविदा बोलावितेवेळी ५०% लाभार्थ्यांसाठी संक्रमण शिबिर व ५०% लाभार्थ्यांसाठी घरभाड देणे असे प्रस्तावित होते. सदर तरतुद सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मध्ये करण्यात आलेली आहे.

३) सदर प्रकल्पांतर्गत संक्रमण शिबिर ट्रक टर्मिनलच्या आरक्षणावर प्रस्तावित असल्याने सदर आरक्षणाचा काही भाग हा महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना, अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे आवश्यक होते. त्या अनुशंगाने मा. महासभा दि. २०/११/२००९ ठराव क्र. ३६ अन्वये मंजूरी घेऊन फेरबदलाचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला. या बाबत सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर नगरविकास विभाग अधिसुचना क्रमांक टीपीएस-१२११/२४८/प्र.क्र.२९४/११/ नवि-१२ दि. २७/०३/२०१२ अन्वये १२,२३९ चौ.मीटर क्षेत्रावर संक्रमण शिबिराचे आरक्षण मंजूर करण्यात आले आहे.

४) जनतानगर येथील जे-३ व जे-१ पॅकेजमधील झोपडया हटवुन त्याठिकाणी उंच ३० मी. चा डोंगर खोदाई करणे व सदर माती टाकण्यास महानगरपालिकेकडे जागा उपलब्ध नव्हती. सदर भागातील खाजगी जमीन मालकाच्या परवानगी नुसार माती भराव करण्यात आला. सदर डोंगर खोदाईच्या कामास झालेल्या विलंबामुळे इमारतीचे काम विलंबाने सुरु झालेले आहे.

५) जे-3 पॅकेजमधील डोंगरखोदाईमुळे इमारतीच्या बाजुस धोकादायक स्थिती झाल्यामुळे भविष्यात कुठलीही दुर्घटना घडु नये या अनुअषंगाने मा. आयुक्त यांच्या मंजुरीने सदर भागात Reatining wall चे काम करण्यात आले आहे.

६) झोपडपट्टी धारकांचा सर्वेक्षणास विरोध असल्याने सर्वेक्षण वहीत वेळेत पूर्ण न होता त्यास अधिक कालावधी लागणे.

७) झोपडपट्टीच्या जवळच संक्रमण शिबीर पाहीजे, अतिरिक्त संक्रमण शिबीराची मागणी करणे. संक्रमण शिबीराची खोली अपूरी आहे म्हणून शिबीरात जाण्यास विरोध करणे.

८) झोपडी खाली करण्याच्या पूर्वी सदनिकाचे लॉटरी व रजिस्ट्रेशन करावे असा आग्रह असणे. रजिस्ट्रेशन झालेनंतरच झोपडी खाली करणे.

९) पात्र झोपडी धारक स्वतःच्या पात्र झोपडीत पार्टीशन, नवीन दरवाजा बसविणे, नवीन बांधकाम करणे व त्यास नवीन नंबर देणे बाबत मागणी करणे व पात्र झोपडी खाली करण्यास नकार देणे

**१) भाडेचे २ वर्ष पुर्ण**

प्रकल्पामध्ये लाभार्थींना भाडेचा २ वर्षाचा ३०००/- प्रमाणे रु.७२०००/- देण्याची तरतुद आहे. सदर भाडेचे २ वर्ष पुर्ण झालेले ओहत व सदर लाभार्थींना पुढील कालावधीसाठी भाडेचे धनादेश देण्याची गरज आहे. भाडेतत्वावर गेलेल्या 1044 मधुन लोढा अक्वा इमारतीमध्ये 569 लाभार्थींना स्थलांतरीत केलेले आहे. व जे-3 पॅकेजमधील इमारत क्र.1 मध्ये 75 लाभार्थींना सदनिकाचा ताबा देण्यात आलेला आहे. उर्वरीत 400 लाभार्थींना व झोपडी तोडलेले पण भाडे किंवा शिफ्टींग न मिळालेले 193 असे मिळुन 593 लाभार्थींना भाडे देणे बाकी आहे. मुळ निवीदेतील अटी शर्तीनुसार सदर लाभार्थींना भाडे देण्याची जबाबदारी संबधीत ठेकेदाराची असुन सदर भाडे देणेबाबत ठेकेदारास तोंडी व पत्रान्वये सुचीत केलेले आहे.

प्रकल्पातील भाडेच्या लाभार्थीचा तपशिल

| अ.क्र. | पॅकेज | लाभार्थी संख्या | एकुण रक्कम | प्रदान करण्यात आलेली भाडेची रक्कम | उर्वरित प्रदान करावयाची भाडेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | जे-१ | १५५ | ९०,८१,०००/- | - | ९०,८१,०००/- |
| २ | जे-२ | १२६ | ७५,१२,०००/- | - | ७५,१२,०००/- |
| ३ | जे-३ | २९२ | १,७९,२२,०००/- | ९६,७८,०००/- | ८२,४४,०००/- |
| ४ | काशिचर्च पॅकेज | २० | १५,४२,०००/- | - | १५,४२,०००/- |
| | एकुण | ५९३ | ३,६०,५७,०००/- | ९६,७८,०००/- | २,६३,७९,०००/- |

भाडेच्या लाभार्थींचा तपशील

| अ.क्र. | भाडेचे लाभार्थी | संक्रमण शिबीर लाभार्थी | इमारत क्र.01 मधील ताबा दिलेले भाडेचे लाभार्थी | एकुण स्थलांतरीत लाभार्थी | उर्वरित 2 वर्ष पुर्ण झालेले भाडेचे लाभार्थी व भाडे किंवा शिप्टींग न मिळालेले लाभार्थी | जुन 2017 पर्यंत होणारी भाडयाची रक्कम (भाडेचे - 400 व भाडे किंवा शिप्टींग न मिळालेले 193 लाभार्थी) असे एकुण 593 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1044 | 1087 | 75 | 2042 | 593 | 2,63,79,000/- |

**रेंटल हाऊसींग स्कीम**

सदर प्रकल्पअंतर्गत लाभार्थींना संक्रमण शिबीर व भाडेतत्वावर स्थलांतरीत करुन इमारतीच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे. प्रकल्पास विविध कारणामुळे विलंब झालेला आहे. सदर झालेल्या विलंबामुळे भाडे तत्वावरील लाभार्थीचे भाडेचे २ वर्ष पुर्ण झालेले असुन पुढील भाडेसाठी लाभार्थी पाठपुरावा करत आहेत. प्रकल्पाचा कालावधी पुर्ण झालेला असुन यापुढे शासनाकडुन निधी मिळणार नाही. सदर प्रकल्पातील भाडेतत्वावरील लाभार्थीमधील ५६५ लाभार्थींना एम.एम.आर.डी.ए कडुन प्राप्त रेंटल हाऊॅसींगच्या सदनिकामध्ये तात्पुरत्या स्वरुपात स्थंलातंरीत केलेले आहे. रेंटल हाऊसींग मधील सदनिका शासनाने परवडणारी घरे या योजनेमध्ये परावर्तीत केलेले आहे. एम.एम.आर.डी.ए. कडुन रेंटल हाऊसीग स्कीम मधुन प्राप्त होणाऱ्या सदनिकामध्ये भाडेतत्वावरील लाभार्थींना स्थलांतरीत करणेबाबत मा. महासभा दि. १३/०७/२०१५ मध्ये ठराव पारित केलेला आहे. भाडेतत्वारील व झोपडया तोडलेल्या ५९३ लाभार्थींना स्थंलातर करण्यासाठी रेंटल हाऊसींग च्या इमारतीची गरज आहे.सद्यस्थितीत डेल्टा गार्डन, मौजे महाजनवाडी येथील इमारती अंतीम टप्प्यात आहेत. सदर इमारतीचा ताबा लवकरात लवकर घेणेबाबत नगररचना विभागास अवगत करण्यात येत आहे.

**भाडेचे रक्कम RTGS द्वारे**

मा.महासभा दि.२०/११/२००९ ठराव क्र३६ व मा.स्थायी समिती सभा दि.०५/०८/२०१० ठराव क्र३१ अन्वये सदर लाभार्थीना संक्रमण म्हणजे संक्रमण शिबीर खोली / भाडे द्यावयाची तरतुद असल्याने सदर लाभार्थींच्या खातेवर महानगरपालिकेमार्फत RTGS द्वारे भाडयाची रक्कम जमा करण्यात आली आहे. सदर लाभार्थीची झोपडी तोडण्यात आली असून सदर लाभार्थी भाडेच्या सदनिका मध्ये राहत आहेत. त्यामुळे सदर लाभार्थी संक्रमण शिबीर खोली अथवा भाडयाची मागणी करत आहेत. सद्यास्थितीत महानगरपालिकेकडे संक्रमण शिबीर खोल्या नसल्याने सदर लाभार्थ्यांना भाडे देणे गरजेचे होते. त्यामुळे भाडेचे २ वर्ष पुर्ण होणाऱ्या १९५ लाभार्थीच्या बॅक खातेवर RTGS द्वारे मार्च २०१६ पर्यंत भाडेची रक्कम जमा करण्यात आली आहे. उर्वरीत ५९३ मधील १८४ लाभार्थीचे जुन २०१७ पर्यतच्या भाडेची रक्कम मे. श्रीजी बिटकोन (जेव्ही) यांच्या चालु देयकातुन कपात करुन लाभार्थीच्या बॅक खातेवर RTGS द्वारे जमा करण्यात आली आहे.

योजनेची सद्यस्थिती :-

| अ.क्र. | पॅकेज | कामाचा तपशिल | इमारत बांधकामासाठी ठेकेदारास प्रदान करण्यात आलेले देयक | सद्यास्थीतीत ठेकेदारास उर्वरित बाकी प्रदान करावयाचे देयक | पॅकेज मधील 1918 सदनिकाचे काम पुर्ण करण्यासाठी लागणारा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | जे-१ | 1)इमारत क्र.06, 299 सदनिका, सदर इमारतीचे RCC चे काम 11 व्या मजल्या पर्यंत पुर्ण झाले आहे. सदर इमारतीचे 12 व्या मजल्याच्या RCC चे काम सुरु आहे. सदर इमारतीच्या 5 व्या मजल्याचे Brick work चे काम सुरु आहे.<br>2) इमारत क्र. ०७, ३६२ सदनिका, सदर इमारतीचे खोदकाम ६० % पुर्ण झाले आहे. | रु.14,27,62,223/- | रु.8,25,15,029/- | रु.99,21,54,139/- |
| २ | जे-३ | 1) इमारत क्र. 01, (179 सदनिका) ची सर्व कामे पुर्ण झाली असुन 170 पात्र लाभार्थीना सदनिकाचा ताबा देण्यात आला आहे.<br>2) इमारत क्र. 02, 229 सदनिका, सदर इमारतीचे 2 ऱ्या मजल्यापर्यंतचे RCC चे काम पुर्ण झाले आहे. सदर इमारतीचे 3 ऱ्या मजल्याच RCC काम चालु आहे.<br>3) इमारत क्र.03, 299 सदनिका, सदर इमारतीचे RCC चे काम 8 व्या मजल्या पर्यंत पुर्ण झाले आहे. सदर इमारतीचे 9 व्या मजल्याचे RCC चे काम सुरु आहे. सदर इमारतीचे 6 व्या मजल्याचे Brick Work चे काम चालु आहे.<br>4) इमारत क्र. 04, 299 सदनिका, सदर इमारतीचे RCC चे काम 1 ला मजल्या पर्यंत RCC चे काम सुरु आहे.<br>5) इमारत क्र. 05, 299 सदनिका, सदर इमारतीचे खोदकाम 90% पुर्ण झाले आहे. फुटींग स्टफ कॉलम आणि प्लींथ चे काम चालु आहे. | रु.52,85,42,379/- | रु.2,20,96,945/- | रु.103,60,66,415/- |
| ४ | काशिचर्च पॅकेज | काशिचर्च इमारत क्र.03, 129 सदनिका,सदर इमारतीचे 60% RCC चे काम 8 व्या मजल्यापर्यंत पुर्ण झाले आहे. सदर इमारतीचे 60% Brick work चे काम 7 व्या मजल्यापर्यंत पुर्ण झाले आहे. उर्वरित इमारतीचे 40% प्लींथचे काम सुरु आहे. | रु.4,95,20,068/- | रु.9,93,641/- | रु.9,94,92,554/- |
| | | एकुण | रु.72,08,24,671/- | रु.10,56,05,615/- | रु.212,77,13,108/- |

**Reatining wall**

जनतानगर येथील जे-3 पॅकेज संजय गाधी राष्टीय उद्याना लगत असुन सदर भागात 25 मी. उंचीचा डोंगर होता. इमारतीच्या बांधकामासाठी सदर डोंगर खोदाई करण्यात आली. सदर डोंगर खोदाईमुळे सदर भागात धोकादायक स्थिती निर्माण झाली होती, या स्थितीत डोंगराचा भाग कोसळण्याची शक्यता होती त्यामुळे इमारतीच्या बांधकामाचे काम करणे अत्यंत धोकादायक होते, त्यामुळे सदर ठिकाणी Reatining wall बांधणे गरजेचे होते. त्यानुसार तत्कालीन मा. आयुक्त यांच्या मंजुरीने तांत्रीक सल्लागाराच्या अभिप्रायानुसार सदर Reatining wall चे काम पुर्ण करण्यात आले आहे. सदर Reatining wall च्या कामामुळे इमारत क्र. 1 चे काम पुर्ण होऊन लाभार्थींना सदर इमारती मधील सदनिकाचा ताबा देण्यात आला आहे.

**विधी विभागाचा अभिप्राय**

As Per clause 21 (a)(Page No.60) of chapter - V Conditions of Contract tender document Engineer - in - Charge shall be entitle (Other than default on the part of Bidder for which the corporation is entitled to rescind the contract) to stop the whole or part of work by giving a notice in writing to bidder of such desire and upon the receipt of such notice the bidder shall forthwith stop the work wholly or in part if required after having due Regards to appropriate stage at which the work should be stopped the Bidder Shall have no claim to any payment or compensation what so-ever by Reason of in pursuance of any notice as aforesaid on account of any stoppage or curtailment except to the extent specified hereunder sub clause (b) & (C)

As Per the aforesaid clause the contractor shall not be entitle to claim any payment or compensations from corporation for such stoppage.

In case the Contractor raised any Dispute against such notice stoppage he has to refer dispute to Arbitration as per clause 27 (disputes & Arbitration) (page No.44) under Indian Arbitration Act.

Since the said BSUP Project has already been delayed and in case the present Contractor on receiving stoppage notice from the corporation raises any disputes which may cause further delay the corporation can allow the present Contractor (Who are not defaulter & willing to do work as per new policy) to participate in the new contract.

So it is advisable to give prior notice to the Contractors as per the provision of clause 21 (a) of tender document.

विधी अधिकारी यांनी वरिलप्रमाणे अभिप्राय दिल्यानुसार विषयांकित प्रकल्प प्रधान मंत्री आवास योजनेतुन प्रस्तावित करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता मिळल्यानंतर निविदेतील तरतुदीनुसार संबंधीत ठेकेदार यांना नोटीस देऊन पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

**विस्थापीत झालेले व विस्थापीत न झालेले बी.एस.यु.पी.प्रकल्पाचे लाभार्थीबाबत प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये**

**प्रस्ताव सादर करणे.**

जनतानगर व काशिचर्च येथील झोपडी तोडुन स्थलांतर केलेल्या लाभार्थीना व सद्यस्थितीत जागेवर असलेल्या लाभार्थींना प्रधानमंत्री आवास योजनेत सामावुन घेणेसाठी मा. महासभेच्या मंजुरीनंतर सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास सादर करण्यात येणार आहे.

**प्रधानमंत्री आवास योजना**

सदर प्रकल्प वेळेत पुर्ण करता यावा यासाठी मा.महासभेच्या मान्यतेने कंत्राटदाराना सुधारीत दर मंजुर करुन देण्यात आले तथापी शासनाकडून ५०% वाणिज्य वापर परवानगी न आल्याने व योजनेस मुदतवाढ न दिल्याने, महानगरपालिकेची स्वतःचा निधी टाकून योजना पुर्ण करण्याची क्षमता नसल्याने सदर सुधारीत दरानुसार प्रकल्प पुर्ण होणार नाही.

मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दि.१४ जुन २०१७ रोजी झालेल्या बैठकीत मा.मुख्यमंत्री यांनी सदर योजना प्रधानमंत्री आवास योजनेतुन पुर्ण करावी असे निर्देश दिले. त्या अनुशंगाने या विभागामार्फत बी.एस.यु.पी.योजनेतंर्गत प्रत्यक्ष झालेले काम, कामावर झालेला खर्च, बी.एस.यु.पी.योजनेत शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान (एक इमारतीचा हिस्सा वगळून) शासनास परत द्यावे लागणार असल्याने, तसेच महानगरपालिकेस भविष्यात स्वतःच्या निधीतुन काही ही खर्च येऊ नये यासाठी प्रत्यक्षात प्रधानमंत्री आवास योजनेतुन काम पुर्ण करण्यासाठी लागणारा चटई क्षेत्र याची माहिती व अभ्यास करुन शासनाकडे प्रस्ताव पाठवून मंजुर झाल्यानंतर उर्वरित सर्व कामासाठी नव्याने निविदा प्रसिध्दी करावी लागेल. तत्पुर्वी बी.एस.यु.पी. योजनेतंर्गत सुरु असलेली कामे व कंत्राटे रद्द करावी लागतील. बी.एस.यु.पी. योजना बंद झाल्याने व शासनाकडून प्रकल्पात कोणतही मुदतवाढ, अनुदान, Escalation इ. देण्याबाबत असमर्थता दर्शविल्याने सदर प्रकल्प प्रधानमंत्री आवास योजनेतुन करावा लागणार आहे २.५० चटई क्षेत्र फक्त बी.एस.यु.पी.योजने पुरतीच मर्यादीत होते, तथापी प्रधानमंत्री आवास योजनेतुन प्रकल्प प्रस्तावित केल्यास २.५ ते ४ चटई क्षेत्र पर्यंत परवानगी मिळू शकेल.

शासन निर्णय क्र.प्रआयो.2017/प्र.क्र.4/गृहनिधो-2 दि.14 मार्च 2017 गृहनिर्माण विभाग यांच्या मार्गदर्शन सुचनानुसार विविध अमंलबजावणी यंत्रणानी तयार केलेले प्रस्तावाच्या अनुषंगाने जादा FSI देणे जमिनीचे क्षेत्र व उपलब्ध ते नुसार आरक्षणात बदल करणे स्थानिक स्वराज्य संस्थेकडे असलेली वित्तीय तरतुद व नविन तंत्रज्ञान आत्मसात करणे इ. साठी व प्राप्त प्रस्ताव छाननी करण्याकरीता उपसमिती यांचेकडे सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करुन मान्यता घेणे शक्य आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत सदर प्रकल्पासाठी चटई क्षेत्र निर्देशंक जास्तीत जास्त 4.00 FSI लागणार आहे. सदर वाढीव FSI साठी महाराष्ट्र शासनतंर्गत Maharashtra State New Housing Policy & Action Plan, 2015 मध्ये प्रकरण क्र. 3, 3.5 (ii) यानुसार आपण शासनाकडे 4.00 पर्यंत FSI ची मागणी करुन शकतो. व शासन वरील नियमानुसार आपणांस वाढीव FSI ची मान्यता देऊ शकते.

**अनुदान तपशिल**

प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत राज्य शासन व केंद्र शासन यांच्याकडून अपेक्षीत अनुदान 3957 x 200000 =79.14 cr. एवढे अनुदान अपेक्षीत आहे. सदर योजना राबविताना बि.एस.यु.पी.प्रकल्पातील प्राप्त अनुदान न परत केल्यास एकुण रु.124.807 कोटी एवढया निधीची आवश्यकता असणार आहे.

**लाभार्थी व बांधकाम क्षेत्रफळ**

- बी.एस.यु.पी.योजनेतंर्गत जनतानगर व काशिचर्च येथील एकुण पात्र लाभार्थींची संख्या 4136 एवढी आहे.
- सदर योजनेतुन प्रत्यक्ष इमारत क्र.01 मध्ये 179 सदनिका तयार करुन लाभार्थ्यांना ताबा देण्यात आलेला आहे.
- सद्यस्थीतीत एकुण 3957 लाभार्थ्यांना घर देणे बाकी आहे. प्रकल्पातील उर्वरित लाभार्थीसाठी स्वतंत्र योजना करावी लागेल, सदर योजना पुर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेत प्रस्तावित करावी लागेल.
- सदर योजनेमध्ये एकुण बांधकाम क्षेत्र 1,81,863 Sq.mt एवढे आहे.

**प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये होणारे बांधकाम**

बी.एस.यु.पी प्रकल्पातील सद्यस्थितीत झालेले बांधकाम सोडुन उर्वरित इमारतीचे काम पुर्ण करण्यासाठी बांधकामाबाबत मा. महासभेच्या मंजुरीनंतर प्रकल्प व्यवस्थापक यांचेकडुन सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्यात येणार आहे.

**पंतप्रधान आवास योजना राबविण्याचा तपशील**

सदर योजना पंतप्रधान आवास योजनेतंर्गत राबविल्यास एकुण 4.00 चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन जनतानगर व काशिचर्च येथील जागेवर 2,64,686.08 चौ.मी एवढे चटई क्षेत्र मंजुर होणे शासनाकडून अपेक्षीत आहे. बी.एस.यु.पी योजनेतंर्गत 4136 घरासाठी 1,42,071.33 चौ.मी. एवढा चटई क्षेत्र लागणार असून उर्वरित

(१२)

1,22,614.75 चौ.मी. एवढे चटई क्षेत्र विक्रीस उपलब्ध होऊ शकते. सदर उर्वरित 1,22,614.75 चौ.मी.चटई क्षेत्र सदर जागेच्या चालू वर्षातील सरासरी रेडी रेक्नर दरानुसार रु.26,910.00 चौ.मी. असे धरल्यास महानगरपालिकेस एकुण 329.96 कोटी एवढे उत्पन्न मिळू शकते. शासनाकडील प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत येणारे रु.79.14 कोटी अनुदान असे एकुण 409.10 कोटी प्रकल्पासाठी निधी उभा करता येऊ शकतो. महानगरपालिकेस स्वत: चा रु.124.807 कोटी एवढा निधी उपलब्ध करावा लागेल. सदर योजना पुर्ण करण्यासाठी जागेची विक्री झाल्यानंतर 36 महिन्याचा कालावधी अपेक्षीत आहे.

केंद्र शासनाने 4136 सदनिकाचा प्रकल्प 2351 सदनिकासाठी सिमित केलेला आहे. सदर 2351 सदनिकासाठीचे इमारतीच्या बांधकामाचे काम विविध टप्प्यावर सुरु असून सदर प्रकल्पातंर्गत पॅकेज निहाय इमारतीच्या बांधकामावर व डोंगर खोदकाम इ. कामासाठी प्राप्त निधी खर्च झालेला असून तो संबंधित ठेकेदारांना वितरीत केला आहे. सद्यस्थीतीत इमारतीचे काम वेगवेगळया टप्प्यावर असून यांची माहिती मुद्दा क्र.03 दर्शविण्यात आलेली आहे. सदर निधी खर्च झालेला असून शासनास अनुदान परत करणे शक्य नसल्याबाबत शासनास कळवावे लागणार आहे. वरील नमुद रुपये 59.60 कोटी इतका निधी BSUP प्रकल्पावरच खर्च झाला असून तो शासनास परत करणे शक्य नाही.

वरील वस्तुस्थीती पाहता सदर बी.एस.यु.पी प्रकल्प प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत प्रस्तावीत करुन योजना पुर्ण करण्याच्या दृष्टीने विचार विनिमय करुन निर्णय घेण्यास शिफारस आहे.

(बी.जी.पवार)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-08/VP /2017-18 /MG -08

गोषवारा प्राप्त दि.29/08/2018 वेळ 3:09:94 am
गा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ......92......
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि.२६/०७/२०१८

**बांधकाम विभाग**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक. ( ४५ )** :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आजी माजी सैनिकांसाठी विरंगुळा केंद्र तयार करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आजी-माजी सैनिक वास्तव्यास असून सदर सैनिकामार्फत जागेची मागणी करण्यात आलेली आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत विविध भागात जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र तयार करण्यात आलेले आहेत. त्याच धर्तीवर महानगरपालिका क्षेत्रातील आजी-माजी सैनिकांसाठी विरंगुळा केंद्र तयार करुन त्यांच्या संस्थेस हस्तांतरीत केल्यास त्याचा लाभ त्यांना होऊन महानगरपालिकेस देखिल त्यांच्या अनुभवाचा प्रशासकीय कामकाजात फायदा होऊ शकेल. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र.246 व 230 या जागेत अनुज्ञेय क्षेत्रात सदर विरंगुळा केंद्र बांधता येऊ शकेल. सदर कामाच्या खर्चासाठी सन 2018-19 या वर्षाच्या अर्थसंकल्पात "जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र तयार करणे" या लेखाशिर्षाखाली रु.150.00 लक्ष एवढी तरतुद आहे. सदर प्रस्तावाबाबत निर्णय होणेस शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
18/7/18
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

# समाजविकास विभाग

# मा. विशेष महासभा

# सभा दि.26/06 /2018

## // गोषवारा //

**प्रकरण क्रं. (48) :- फेरीवाला/ना फेरीवाला क्षेत्राचे पुर्नविलोकन करणे व धोरण ठरविणेबाबत केलेल्या ठरावावर पुर्नविचार करणेबाबत.**

**संदर्भ :- 1) शासन निर्णय नगरविकास विभाग क्रं.राफेधो-0309/प्र.कं.20/नवि-34 दि.2 मार्च 2009**

**2) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं.राफेधो-2013/प्र.क.39/नवि-34 दि.21/10/2013**

**3) शासन निर्णय क्रं.एन.यु.एल.एम/2014/प्र.क्र.104/नवि-33 दि.28 ऑगस्ट् 2014 रोजीचे पत्र.**

**4) नागरी पथविक्रेत्यांच्या अधिकारांचे रक्षण करणे आणि पथविक्रेत्यांच्या कृत्यांचे नियमन 2014 च्या अनुषंगाने "शहर फेरीवाला समिती सदस्य् नियुक्ती बाबत मा. आयुक्त् सो. यांची दि.04/09/2015 रोजीची मान्यता.**

**5) महाराष्ट्र शासनाने केद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिध्द् केलेले नियम व आदेश याव्यतीरीक्त्) नियम व आदेश (दि.3 ऑगस्ट् 2016) महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम,2016**

**6) IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY ORDINARY ORIGINAL CIVIL JURISDICTION WRIT PETITION NO.652 OF 2017**

मिरा भाईंदर महानगरपालिका "दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाची" अंमलबजावणी करण्यात येत आहे. "दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान" (DAY-NULM) "शहरी फेरवाल्यांना सहाय्य" उपांगाअंतर्गत "शहरी पथविक्रेत्यांच्या अधिकारांचे रक्षण करणे आणि पथविक्रेत्यांच्या कृत्यांचे नियमन 2014 च्या अनुषंगाने शासन निर्णय महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग राफेधो-2013/प्र.क्र.39/नवि-24 दि.21 ऑक्टोबर 2013 अन्वये "राष्ट्रीय फेरीवाला धोरण 2009"लागु करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणेबाबत निर्देशाप्रमाणे संदर्भिय अनुषंगाने "शहर फेरीवाला समितीवर" एकुण 30 सदस्याची आयुक्त यांच्या

अध्यक्षतेखालील समिती दि.23/3/2015 पासुन एक वर्षासाठी गठीत करण्यात आलेली होती. तरी त्या समितीची रचना खालीलप्रमाणे,

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रवर्ग</th><th>तपशील</th><th>एकुण संख्या</th></tr>
<tr><td>1</td><td>1</td><td>महाराष्ट्र शासनाच्या आदेशामध्ये नमुद केलेनुसार पहिल्या प्रवर्गासाठी विविध प्रशासकीय अधिकारी असलेल्या एकुण 06 सदस्यांची समितीवर निवड
<table>
<tr><td>1)</td><td>अध्यक्ष</td><td>आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका</td></tr>
<tr><td>2)</td><td>सदस्य</td><td>पोलिस अधिक्षक, ठाणे ग्रामीण</td></tr>
<tr><td>3)</td><td>सदस्य</td><td>सहा. संचालक,नगररचना विभागातील ज्येष्ठ अधिकारी</td></tr>
<tr><td>4)</td><td>सदस्य</td><td>तहसिलदार, ठाणे</td></tr>
<tr><td>5)</td><td>सदस्य</td><td>पोलिस उपाध्यक्ष, वाहतुक ठाणे ग्रामीण</td></tr>
<tr><td>6)</td><td>सदस्य सचिव</td><td>उप-आयुक्त, परवाना विभाग,मिरा भाईंदर महानगरपालिका</td></tr>
</table></td><td>06</td></tr>
<tr><td>2</td><td>2</td><td>मिरा भाईंदर शहरातील विविध फेरीवाला संघटनाच्या प्रतिनिधींची शहर फेरीवाला समितीच्या एकुण सदस्य संख्येपैकी किमान 40% म्हणजेच 12 इतके प्रतिनिधी समिती सदस्य म्हणुन नेमणूक करण्यात येणार आहे.</td><td>12</td></tr>
<tr><td>3</td><td>3</td><td>मिरा भाईदर शहरातील विविध रेसिडेन्ट वेलफेअर असोशिएशन, समुदाय आधारीत संघटना(कम्युनिटीबेस ऑर्गनायझेशन) या संघटनाच्या प्रतिनिधींची शहर फेरीवाला समितीच्या एकुण सदस्य संख्येपैकी किमान 20% म्हणजेच 6 इतके प्रतिनिधी समिती सदस्य म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे.</td><td>06</td></tr>
<tr><td>4</td><td>4</td><td>मिरा भाईंदर शहरातील विविध इतर नागरी (सिव्हिल) संस्था/संघटना, जशा व्यावसायिक समुहातील प्रतिनिधी जसे वकील, डॉक्टर, नगररचनाकार, आर्किटेक्ट इ. व्यापार व वाणिज्य समुहाचे प्रतिनिधी, शेडयुल्ड बँकेचे प्रतिनिधी अथवा महत्वाचे नागरिक इत्यादींचे प्रतिनिधीमधून शहर फेरीवाला समितीच्या एकुण सदस्य संख्येपैकी किमान 20s म्हणजेच 6 इतके प्रतिनिधी समिती सदस्य म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे.</td><td>06</td></tr>
</table>

तरी संदर्भिय पत्र क्र.4 महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिध्द केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश (दि.3 ऑगस्ट 2016) महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, 2016 क्र.राफेधो-2015/प्र.क्र.403/नवि-34 नगरविकास विभाग, दि.6 ऑगस्ट 2016 च्या आदेशान्वये नविन फेरीवाला समितीची रचना व कार्ये याबाबत कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे उपरोक्त समिती मा. आयुक्त सा ो. यांच्या मंजुरीनुसार दि.22/08/2016 रोजी रद्द करण्यात आली होती. व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-4 अ, दि.03/08/2016 पथविक्रेता (उपजविविका संरक्षण व पथविक्री विनिमयन) अधिनियम 2014 प्रकरण चार नगरपथविक्रीता समिती रचना (नियम-2) इतर मंडळे मिळुन नगरपथ विक्रेता समितीची रचना करण्यात आली होती.

| अ.क्र. | शासकीय विभाग | सदस्य् संख्या |
|---|---|---|
| 1 | महानगरपालिका आयुक्त् -अध्यक्ष | 01 |
| 2 | पोलीस आयुक्त् किंवा पोलीस अधिक्षक - सदस्य् | 01 |
| 3 | विशेष नियोजन प्राधिकरणाचे कार्यकारी प्रमुख किंवा प्रतिनिधी | 01 |
| 4 | पोलीस सह-आयुक्त् किंवा पोलिस उप-अधिक्षक/सहाय्य्क पोलिस अधिक्षक (वाहतुक-प्रभारी अधिकारी) | 01 |
| 5 | कार्यकारी आरोग्य् अधिकारी किंवा मुख्य् वैदयकिय अधिकारी | 01 |
| ख | इतर मंडळे | |
| 1 | पथ विक्रेते (यापैकी अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती इतर मागास वर्ग, अल्पसंख्याक आणि विकलांग व्यकती) यांच्या योग्य् प्रतिनिधीत्वासह एक तृतीयांश महिला विक्रेत्या असतील) | 08 |
| 2 | अशासकीय संघटना आणि सामुदाय आधारीत संघटना | 02 |
| 3 | निवासी कल्याण संघ | 02 |
| 4 | व्यापारी संघाचा प्रतिनिधी | 01 |
| 5 | पणन संघाचा प्रतिनिधी | 01 |
| 6 | अग्रणी बँकेचा प्रतिनिधी | 01 |
| | एकुण | 20 |

उपरोक्त समिती अंतर्गत नगरपथविक्रेता समिती रचना (नियम-2) इतर मंडळे या घटकांतर्गत अनुक्रमांक 1 याकरीता शासननिर्णयानुसार सर्व्हेक्षण अंती निवडणूक घेवुन

8 सदस्यांची निवड करावयाची होती. अनुक्रमांक 1 वगळुन इतर मंडळे मधील घटका अंतर्गत नगरपथ विक्रेता समिती स्थापन करण्यात आलेली होती.

सदर समिती दि.10/07/2017 रोजी नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सदस्य नामनिर्देशनाकरिता प्रस्तावित करण्यात आली होती.

परंतु संदर्भ क्रं.6 नुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशान्वये फेरीवाला समिती गठीत करण्याबाबत दि.09/01/2017 रोजीचा शासन निर्णय रद्द केलेला आहे. तरी नविन "नगरपथविक्रेता समिती गठीत करण्याबाबाबत" मा. उच्च न्यायालयाने 6 आठवडयांचा कालावधी निश्चित केलेला आहे. नविन "नगरपथविक्रेता समितीची" रचना खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | प्रवर्ग | तपशील | एकुण संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 1 | "महाराष्ट्र शासनाच्या आदेशामध्ये नमुद केलेनुसार पहिल्या प्रवर्गासाठी विविध प्रशासकीय अधिकारी असलेल्या एकुण 06 सदस्यांची समितीवर निवड<br>1) अध्यक्ष – मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका<br>2) सदस्य – पोलिस अधिक्षक, ठाणे ग्रामीण<br>3) सदस्य – सहा. संचालक,नगररचना विभागातील ज्येष्ठ अधिकारी<br>4) सदस्य – तहसिलदार, ठाणे<br>5) सदस्य – पोलिस उपाध्यक्ष, वाहतुक ठाणे ग्रामीण<br>6) सदस्य सचिव – उप-आयुक्त, परवाना विभाग,मिरा भाईंदर महानगरपालिका | 06 |
| 2 | 2 | मिरा भाईंदर शहरातील विविध फेरीवाला संघटनाच्या प्रतिनिधींची शहर फेरीवाला समितीच्या एकुण सदस्य संख्येपैकी किमान 40% म्हणजेच 12 इतके प्रतिनिधी समिती सदस्य म्हणुन नेमणूक करण्यात येणार आहे. | 12 |
| 3 | 3 | मिरा भाईदर शहरातील विविध रेसिडेन्ट वेलफेअर असोशिएशन, समुदाय आधारीत संघटना(कम्युनिटीबेस ऑर्गनायझेशन) या संघटनाच्या प्रतिनिधींची शहर फेरीवाला समितीच्या एकुण सदस्य संख्येपैकी किमान 20% म्हणजेच 6 इतके प्रतिनिधी समिती सदस्य म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे. | 06 |
| 4 | 4 | मिरा भाईंदर शहरातील विविध इतर नागरी (सिव्हिल) | 06 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | संस्था/संघटना, जशा व्यावसायिक समुहातील प्रतिनिधी जसे वकील, डॉक्टर, नगररचनाकार, आर्किटेक्ट इ. व्यापार व वाणिज्य समुहाचे प्रतिनिधी, शेडयुल्ड बँकेचे प्रतिनिधी अथवा महत्वाचे नागरिक इत्यादींचे प्रतिनिधीमधून शहर फेरीवाला समितीच्या एकुण सदस्य संख्येपैकी किमान 20 % म्हणजेच 6 इतके प्रतिनिधी समिती सदस्य म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे. | |

तरी वरीलप्रमाणे “नगरपथ विक्रेता समिती” गठीत करणेकामी नव्याने अर्ज मागविण्याबाबतची जाहिरात दि. 20/11/2017 रोजी महानगरपालिका संकेतस्थळावर तसेच दैनिकवृत्तपत्रात दिली असुन अर्ज मागविण्याची अंतिम मुदत दि.08/12/2017 आहे. नमुद मुदतीत प्रवर्ग 2, 3 व 4 साठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर एकुण 30 सदस्य असणारी फेरीवाला संघटना गठीत करण्यात येईल.

महाराष्ट्र शासन राजपत्र “अ” साधारण भाग चार अ बुधवार 3 ऑगस्ट 2016 प्रकरण चार (23) अन्वये नगर पथ विक्रेता समितीची कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

**नगरपथ विक्रेता समितीची कार्ये**

अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींना बाधा न आणता, नगर पथ विक्रेता समिती पुढील कार्ये पार पाडील :-

1) महानगरपालिका अधिकारितेच्या क्षेत्रांमधील पथ विक्रेते शोधून काढण्यासाठी सर्व्हेक्षण आयोजित करणे आणि तिच्या अधिकारितेच्या क्षेत्रामध्ये मानके, नियोजन आणि त्यांना धारण क्षमता यानुसार त्याच्या जागेची सुनिश्चिती करणे.
2) पथ विक्री प्रमाणपत्र देण्याकरीता ते पथ विक्री प्रमाणपत्र ज्या अटी व शर्तीच्या अधीनतेने देण्यात येते, त्या अटी व शर्तीचे तो पालन करीत असे वचन त्यांच्याकडुन घेतल्यानंतर पात्र पथ विक्रेत्यास, पथ विक्रीचे प्रमाणपत्र देण्यासाठी पथ विक्रेता समिती, अधिनियमाच्या कलम 38 च्या पोट-कलम (1) अन्वये तयार केलेल्या योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेले निकष अनुसरील.
3) ज्या पथ विक्रेत्याने अधिनियमान्वये किंवा नियमांन्वये किंवा अधिनियामान्वये केलेल्या योजनेअन्वये, पथ विक्रीचे विनियमन करण्यासाठी विनिर्दिष्ठ केलेल्या, त्याच्या कोणत्याही शर्तीचा किंवा इतर कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केला असेल किंवा पथ विक्रीचे असे प्रमाणपत्र, पथ विक्रेत्यांने अपवेदन किंवा लबाडी करुन मिळवलेले आहे अशी नगर पथ विक्रेता समितीची खात्री पटली असेल तर, त्या पथ विक्रेत्याचे पथ विक्रीचे प्रमाणपत्र रद्द करणे किंवा निलंबित करणे.

   परंतु, नगर पथ विक्रेता समिती, पथ विक्रेत्याला कळविलेल्या लेखी आदेशामध्ये पथ विक्री प्रमाणपत्र रद्द किंवा निलंबित करण्याच्या कारणांचा विनिर्देश करील.

4) महानगरपालिकेच्या अधिकारतेमधील क्षेत्र हे पथ विक्री-मुक्त क्षेत्र म्हणून घोषित करण्यासाठी, स्थानिक प्राधिकरणास शिफारस करणे.

5) विक्रीकरीता ठिकाणे आणि जागा निश्चित करणे.

6) सार्वजनिक जागांमध्ये गर्दी होणार नाही याची सुनिश्चिती करण्यासाठी पथ विक्रीच्या वेळी विनियमित करणे.

7) पथ विक्रेत्यांकडून होणाऱ्या विरोधाविरुध्द सुधारात्मक यंत्रणेच्या अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे.

8) तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती (अध्यक्ष-मा. दिवाणी न्यायाधिश किंवा मा. न्यायदंडाधिकारी असलेली व्यक्ती व सदस्य म्हणुन दोन व्यवसायिक व्यक्ती) आणि स्थानिक प्राधिकरण यांच्याकडे प्रलंबित असलेल्या विवादांच्या प्रकरणांचा पाठपुरावा करणे.

9) पथ विक्रेत्यांच्या व्यावसायिक प्रचालनासाठी योजना तयार करण्यासंबंधात स्थानिक प्राधिकरणाला शिफारशी सादर करणे.

10)समितीची कार्ये प्रभावीरीत्या पार पाडण्याची सुनिश्चित करण्यासाठी, समितीच्या बैठका घेणे व यथोचित निर्णय घेणे.

11)अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी पार पाडताना सहाय्य किंवा सल्ला मिळविण्याकरीता शासन किंवा तात्पुरत्या तत्त्वावर असलेल्या इतर अशासकीय संघटना यांच्याकडील तांत्रिक आणि व्यावसायिक व्यक्तीची मदत घेणे.

12)पथ विक्रेत्याला ज्या वेळी पथ विक्रीचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे ती वेळ आणि अशा पथ विक्रीच्या प्रमाणपत्राचे केव्हा नूतनीकरण करण्यात यावे, ती वेळ आणि विहित कालमर्यादेत पार पाडावयाचे उपक्रम यांचा समावेश असलेली सनद किमान एका स्थानिक भाषेत हिंदी व इंग्रजीमधील नामांकित वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करणे आणि नगर पथ विक्रेता समितीच्या कार्यालयात आणि नागरी स्थानिक संस्थांच्या इतर कार्यालयांमध्ये, आवश्यकतेनुसार प्रदर्शित करणे.

13)नोंदणीकृत पथ विक्रेत्यांचा आणि अधिनियमाच्या तरतुदीनुसार ज्या कोणाला विक्रीचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे त्यांच्या अदययावत नोंदी ठेवणे आणि असल्यास संकेतस्थळावर प्रसिध्द करणे.

14) अधिनियमाखाली किंवा नियमाखाली अथवा त्या अन्वये केलेल्या योजनेअन्वये केलेल्या कामकाजांचे सामाजिक लेखापरिक्षण करणे.

15)अधिनियमान्वये आणि या नियमान्वये विहित केलेली अशी विवरणे शासनास व स्थानिक प्राधिकरणास वेळोवेळी पुरविणे.

16)पथ विक्रेत्यांकरीता, पतपुरवठा करणे, विमा उपलब्ध करुन देणे आणि सामाजिक सुरक्षेच्या इतर कल्याणकारी योजना तयार करण्यासाठी प्रचालनात्मक उपाय हाती घेण्याकरीता शासनाकडे टिपणी सादर करणे.

17)अर्थव्यवस्थेमधील पथ विक्रेत्यांच्या भूमिकेसंबंधात जनतेमध्ये जाणीव जागृती करण्यासाठी शासनास सहाय्य करणे.

18)स्थानिक प्राधिकरणाद्वारे आणि शासनाद्वारे नगर पथ विक्रेता समितीला सोपविण्यात येतील अशी अधिनियमाच्या व या नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी असतील अशी अधिनियमाच्या व या नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी असतील अशी इतर कार्ये पार पाडणे.

उक्त नमुद समितीच्या कार्यानुसार पथविक्रेते सर्व्हेक्षण तसेच पथविक्री मुक्त क्षेत्र घोषित करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणास शिफारस करणे ही जबाबदारी "नगरपथ विक्रेता समितीची" आहे. तसेच नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं.बीएमसी-2516/प्र.क्र.1599/2016/नवि-21 दि.9 जानेवारी 2017 **प्रकरण 7.1, विक्री प्रक्षेत्रे निर्धारित करण्याची तत्त्वे-** नगरविक्री समिती या योजनेच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून 6 महिन्याच्या कालावधीत विक्री प्रक्षेत्रे, रस्त्यावरील विक्रीसाठी निर्बंधित विक्री प्रक्षेत्रे आणि ना-विक्री प्रक्षेत्रे निश्चित करील आणि त्याचा तपशिल स्थानिक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर, संचालनालय नगरपरिषद यांच्या स्थानिक प्राधिकरणाकरीता असलेल्या संकेतस्थळावर, स्थानिक प्राधिकरणाच्या सुचना फलकावर तसेच स्थानिक भाषेतील वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करील असे शासन निर्णयात नमुद करण्यात आलेले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत "शहरी पथविक्रेत्यांच्या अधिकारांचे रक्षण करणे आणि पथविक्रेत्यांच्या कृत्याचे नियमन 2010 च्या अनुषंगाने शासन निर्णय महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग राफेधो-2013/प्र.क्रं.39/नवि-20 दि..21 ऑक्टोबर 2013 अन्वये राष्ट्रीय फेरीवाला धोरण 2009 लागु करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणेबाबत निर्देश प्राप्त आहेत.

तसेच मा. उच्च न्यायालय (Writ Petition No.652 of 2017) यांनी याचिकेवर दिलेल्या आदेशाप्रमाणे "शहर फेरीवाला समिती सदस्य् नियुक्ती करिता इच्छुक प्रतिनिधी कडुन अर्ज मागविण्याकरीता 6 आठवडयांची मुदत देण्यात आली होती.

मा. महासभा विषय क्रं.50 नुसार मा. महासभेसमोर फेरीवाला धोरण बाबत माहिती माहितीस्तव सादर करण्यात आली होती परंतु मा. महासभेने दि.08/12/2017 प्रकरण क्रं.50, ठराव क्रं.47 अन्वये फेरीवाला/ना फेरीवाला क्षेत्राचे पुर्नविलोकन करणे व

धोरण ठरविणेबाबत मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली एकुण 6 सदस्य असणारी पदाधिकारी यांची समिती तयार करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | महापौर | अध्यक्ष |
| 2 | उप-महापौर | सदस्य् |
| 3 | स्थायी समिती सभापती | सदस्य् |
| 4 | सभागृहनेते | सदस्य् |
| 5 | विरोधी पक्षनेते | सदस्य् |
| 6 | गटनेते | सदस्य् |

परंतु शासनाने "शहरी पथविक्रेत्यांच्या अधिकाराचे रक्षण करणे आणि पथविक्रेत्यांच्या कृत्यांचे नियमन 2014 च्या अनुषंगाने शासन निर्णय महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग राफेधो/2013/प्र.क्रं.39/नवि-24 दि.21 ऑक्टोबर 2013 अन्वये "राष्ट्रीय फेरीवाला धोरण 2009" लागु करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

तरी मा. महासभा प्रकरण क्रं.50, ठराव क्रं.47 अन्वये तयार केलेली समिती व मा. महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेली समितीची रचना यामध्ये तफावत दिसून येत आहे. तरी सदस्य नेमणुकीबाबतची सद्यस्थिती तसेच सदर ठरावावर पुर्नविचाराकरीता व ठरावामध्ये शासनाचे धोरणानुसार योग्य् बदल करण्याबाबतचा विषय मा. महासभेसमोर ठेवण्यास शिफारस आहे.

(बी.जी.पवार)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि.20/03/2018 वेळ 04.10 नंतर
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. 68
दिनांक 20/03/2018
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा.विशेष महासभा दि.२६/०७/२०१८

## //गोषवारा //

प्रकरण क्र. ४९ :- मा.महासभा दिनांक २६/०२/२०१८ रोजीच्या ठराव क्र.८४ अन्वये पारित केलेल्या जाहिरात विभागाच्या ठरावातील मुद्दा क्र.२ व ३ याबाबत पुर्नविचार करुन निर्णय घेणे व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासुन नव्याने जाहिरात दर व नियोजन करणेकामी एजन्सी नियुक्त करणे बाबत.

जाहिरात विभागात मा.महासभा दि.१९/०३/२००८ ठराव क्र.३५ अन्वये तयार करण्यांत आलेल्या दरानुसार जाहिरात फी ची आकारणी करण्यांत येत होती. तद्नंतर मा.महासभा दि.१९/०७/२०१४ रोजी 'ज' च्या प्रस्तावाद्वारे विषय घेऊन जाहिरात फी दरवाढीचा ठराव क्र.२७ अन्वये दरवाढ मंजुर करुन प्रशासनाला अंमलबजावणीकरीता कळविण्यांत आले. सदरची दरवाढ ही मागील जाहिरात फीच्या दरापेक्षा ६०० ते १२०० टक्क्याने (६ ते १२ पटीने) वाढ असल्याने व आकारमानानुसार दर निश्चित न करता सरसकट दर लावलेले आहेत. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही रस्त्याच्या श्रेणीबाबत उल्लेख नसल्याने तत्कालीन मा.आयुक्तांनी सदरच्या ठरावात बदल करुन नव्याने दरवाढीचा प्रस्ताव मा.महासभेसमोर ठेवला सदरच्या दरवाढीचा प्रस्ताव ९० दिवसांपर्यंत स्विकारला नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अधिसुची 'ड' मधील प्रकरण क्र.२ 'स' मधील तरतुदीनुसार मानीव मान्यतेने अंमलबजावणी करुन शासनास पत्राद्धारे अवगत केलेले आहे. त्यानुसार सन २०१४ ते २०१७-१८ या कालावधीतील मा.आयुक्त यांच्या मान्यतेने जाहिरात फीची वसुली करण्यांत आली आहे.

तद्नंतर मा.महापौर यांच्या मागणी पत्रानुसार जाहिरात विभागातील दरवाढ व नियोजन याबाबत विभागाने गोषवारा देण्याबाबत कळविले असल्याने जाहिरात विभागाने दरवाढ न करण्याबाबतचा गोषवारा दिला होता. परंतु दि.२६/०२/२०१८ रोजी ठराव क्र.८४ अन्वये जाहिरात फी बद्दल निर्णय घेतला सदर ठरावातील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे.

मुद्दा क्र.१) यात मोठा भ्रष्टाचार झाला असुन महानगरपालिकेचे करोडो रुपयांचे नुकसान झाले असुन मा.महापौर यांनी संबंधित सर्व अधिकाऱ्यांची चौकशी करणे कामी मा.मुख्यमंत्री, लाचलुतपत विभाग, तसेच आर्थिक गुन्हे शाखा यांना पत्र द्यावे.

मुद्दा क्र.२) सुधारीत ठराव मंजुर होईपर्यंत मा.आयुक्त यांनी मागील २०१४ च्या ठरावाप्रमाणे कारवाई करावी.

मुद्दा क्र.३) ज्या लोकांनी कमी जुन्या दराने पैसे भरलेले आहेत. त्यांचेकडून जुन्या २०१४ च्या ठरावातील दराने रक्कम वसुल करावी.

मुद्दा क्र.४) तसेच मार्केट दराप्रमाणे दर ठरवून प्रस्ताव मा.महासभेसमोर ठेवून नविन निवीदा काढावी.

असे एकुण चार मुद्दे दि.२६/०२/२०१८ रोजीच्या ठरावात नमुद आहेत. सदर चार मुदयाबाबत इकडील विभागाचा अभिप्राय खालीलप्रमाणे

मुद्दा क्र.१ बाबत प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदीनुसार मानीव मान्यतेने दर मंजुर करुन शासनास याबाबत अवगत करुन कायदेशिर प्रक्रिया पूर्ण केलेली आहे.

मुद्दा क्र.२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दि.१९/०७/२०१४ ठराव क्र.२७ ठरावात नमुद केल्याप्रमाणे ६०० ते १२०० टक्क्याने दरवाढ केल्याने संबंधित जाहिरात एजन्सीधारकांनी जाहिरात फी भरण्यास असमर्थता दर्शविली तसेच जाहिरात दर ठरविताना कोणत्याही रस्त्यांच्या श्रेणीनुसार दर ठरविले नसल्याने सरसकट दराची आकारणी करण्याचे धोरण होते. त्यामुळे तत्कालीन मा.महासभेच्या मानीव मान्यतेच्या ठरावानुसार निश्चित केलेल्या दरानुसार सन २०१४ ते २०१८ पर्यंतची थकबाकीसह मागणी करुन जाहिरात फीची वसुली केलेली असल्याने नव्याने मागणी बजावणे योग्य होणार नाही.

मुद्दा क्र.३ मा.महासभेच्या मानीव मान्यतेनुसार सर्व जाहिरातधारकांकडून नविन दरानुसार सन २०१४-१५ ते २०१७-१८ या आर्थिक वर्षात जाहिरात फी ची वसुली केलेली आहे. मा.महासभा दि.२६/०२/२०१८ रोजीच्या ठराव क्र.८४ नुसार सन २०१४ पासुन नव्याने जाहिरात फी ची मागणी केल्यास कायदेशिर प्रश्न निर्माण होवून प्रकरण न्यायप्रविष्ठ होऊ शकते तसेच यातील काही होर्डिंग्ज सद्यस्थितीत अस्तित्वात नाहीत. त्यामुळे नव्याने २०१४ च्या ठरावाच्या अनुषंगाने मागणी अदा केल्यास जाहिरात विभागाची मागणी फुगुन मोठी दिसेल परंतु वसुली होणार नाही त्यामुळे लेखा आक्षेप तयार होतील.

**तसेच मुद्दा क्र.४ नुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासुन जाहिरात विभागाकरीता रस्त्याच्या श्रेणीनुसार नव्याने जाहिरात फीचे दर तयार करावेत व जाहिरातीचे नियोजन करणेकरीता सार्व.बांधकाम विभागामार्फत एजन्सी नियुक्त करुन त्यांनी तयार केलेला अहवाल मा.महासभेसमोर ठेवून अंतिम निर्णय घेणे उचित वाटते.**

**तरी वरील बाब पहाता मा.महासभा दि.२६/०२/२०१८ ठराव क्र.८४ मधील नमुद मुद्दा क्र.२ व ३ याबाबतच फेर विचार करणे उचित वाटते.**

ठाणे महानगरपालिकेत सन २०१५-१६ मध्ये अश्याचप्रकारे ९०० ते १००० टक्क्याने जाहिरात फीमध्ये वाढ केली असल्याने तेथेही याबाबत अशाप्रकारची परिस्थिती निर्माण झाली होती. ठाणे महानगरपालिकेतील तत्कालीन मा. महासभेने फेर विचार करुन नव्याने दरपत्रक तयार करुन याबाबतचा तिढा सोडविला आहे. त्याप्रमाणेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील जाहिरात विभागात देखील तशाप्रकारची झालेली तांत्रिक अडचण सोडविण्याकरीता दि.२६/०२/२०१८ रोजी पारीत केलेला ठराव क्र.८४ बाबत विचार विनिमय होवून निर्णय घेणेस शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. ११/०८/२०१८ वेळ २:३०
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ...
लिपीक
नगरसचिव विभाग.

१०९

# मिरा भाईंदर महानगरपालिका

विशेष

## मा. महासभा दि. २६ / ०७ /2018

## गोषवारा

विषय ५२: ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून मालमत्तेच्या अपसंपदाबाबत महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 अंतर्गत गुन्हे दाखल केल्यानंतर ॲन्टी करप्शन ब्युरोच्या अधिकाऱ्यांनी त्यांना रंगेहात पकडल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांना सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक: अभियो-1312/ प्र.क्र.30/पुर्नबांधित-1/11अ, दि. 12 फेब्रुवारी, 2013 मधील परिच्छेद 9 (क) नुसार लाचेचा सापळा प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर अपचारी अधिकारी/कर्मचारी यांना तात्काळ निलंबीत करण्याची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्यांनी करावी असे आदेश आहेत. या आदेशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील नियम 4 नुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना महानगरपालिका अधिनियमातील नियम 56 (2) मधील तरतुदीनुसार सेवेतून निलंबीत केलेले आहे.

तथापी, श्री. कुंदन विनायक पाटील, शिपाई यांचे विरुद्ध भाईंदर पोलीस स्टेशन, जि. ठाणे ग्रामीण येथे गुन्हा रजि.नंबर ॥ 407/2016, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 चे कलम 13(1)(इ), 13(2) सह भा.द.वि.स. कलम 109 अन्वये दि.17/12/2016 रोजी गुन्हा दाखल करण्यात आल्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांनी कळविले आहे. परंतु श्री. कुंदन विनायक पाटील, शिपाई यांना संबंधीत प्रकरणी अटक केल्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांच्या पत्रात उल्लेख नाही. म्हणून त्यांना महापालिकेमार्फत निलंबीत करण्यात आलेले नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे नियम 59-अ नुसार महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांचेवर खटला भरण्यास मंजूरी देणे मध्ये खालील प्रमाणे नमुद आहे:-

"कलम 53 किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यांवर किंवा कर्मचाऱ्यांवर खटला भरण्याची मागणी पोलीसांकडून किंवा अन्य कोणत्याही शासकीय अभिकरणाकडून करण्यात आली असेल तर त्यास मंजुरी देण्यास आयुक्त सक्षम असेल. आयुक्त, अशा कोणत्याही कार्यवाहीच्या मंजुरीची माहिती नगरपालिकेच्या पुढील सभेमध्ये महानगरपालिकेला कळवील."

श्री. कुंदन विनायक पाटील, शिपाई यांचेबाबत मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेसाठी महानगरपालिका अधिनियमातील नियम 59-अ अन्वये जा.क्र.मनपा/आस्था/587/2018, दि.15/06/2018 रोजीच्या आदेशान्वये मंजूरी दिली आहे.

तरी वर नमुद केलेल्या कार्यवाहीची माहिती महानगरपालिका अधिनियमातील नियम 59-अ नुसार मा. महासभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

(बालाजी खतगावकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
18/7/18

D-आस्थापना विभाग-गोषवारा-न्यायालय अभियोग दाखल-2018

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि. २६/०७/२०१८

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. :- ४६

विषय : मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये गोरगरीबांवर मोफत उपचार करणेबाबत.

मा. विशेष महासभा दि. १९/०६/२०१७, ठराव क्र. २४ अन्वये शासकीय रुग्णालयातील दराप्रमाणे महानगरपालिकेच्या रुग्णालयात दर आकारण्यास धोरणात्मक मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका रुग्णालयांमध्ये सद्यस्थितीत शासकीय दराने वैद्यकीय सेवा शुल्क आकारले जात आहे.

महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयात नागरिकांच्या सोयीसाठी डायलिसिस केंद्र सुरु करण्यात आले आहे. सदर केंद्राद्वारे दरमहा साधारणतः ३५० ते ४०० डायलिसिस सायकल्सद्वारे रुग्णांना सेवा दिली जाते. याआधी रुग्णांना प्रति डायलिसिस सायकल रु. ३००/- दराने आकारणी होत असे. मात्र सद्यस्थितीत उपरोक्त मा. महासभा ठरावानुसार, शासकीय दराने, म्हणजे रु. २००/- प्रति डायलिसिस सायकल या दराने आकारणी करण्यात येत आहे. शिवाय शासन निर्णयाप्रमाणे सद्यस्थितीत दारिद्रय रेषेखालील व शासन निर्णयात नमूद केलेल्या इतर घटकांना मोफत डायलिसिस सेवा पुरविली जात आहे. उर्वरित डायलिसिस वरील रुग्णांकडून साधारणतः रु. २,००,०००/- एवढे वार्षिक उत्पन्न महानगरपालिकेस अपेक्षित आहे.

मात्र डायलिसिसची गरज लागणाऱ्या रुग्णांपैकी बहुतेक रुग्णांची मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा मूत्रपिंडाच्या वा इतर आजारांमुळे दोन्ही मूत्रपिंडे खराब झालेली असतात. सदर रुग्णांना आठवडयात किमान २ ते ३ वेळा डायलिसिस उपचार घ्यावे लागतात. डायलिसिसची गरज लागणाऱ्या बहुतेक रुग्णांचे आयुर्मान हे ५ ते १० वर्षे एवढेच असते. डायलिसिस सेवेसाठी खाजगी रुग्णालयांमध्ये रु. १,०००/- ते रु. २,०००/- प्रति सायकल एवढा खर्च येतो. त्यामुळे गोरगरीबांबरोबरच सर्वसाधारण आर्थिक स्थिती असणाऱ्या कुटुंबानाही हा आर्थिक भार सोसणे शक्य होत नाही. त्यामुळे डायलिसिस रुग्णाबरोबरच त्याच्या कुटुंबाचेही हाल होतात.

त्यामुळे महानगरपालिकेस डायलिसिस सेवेतून मिळणारे साधारणतः वार्षिक रु. २,००,०००/- (रु. २ लक्ष) एवढे तुटपुंजे उत्पन्न पाहता सदर सेवा पूर्णतः मोफत केली तरीही महानगरपालिकेस आर्थिकदृष्टया फार मोठा बोजा पडणार नाही. त्यामुळे मानवतावादी भूमिकेतून महानगरपालिका रुग्णालयातून देण्यात येणारी डायलिसिस सेवा सर्व गरजू रुग्णांना मोफत करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा. महासभेपुढे सदर विषय सविनय सादर.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\NUHM\Goshvara -Gorgarib Mofat Dialysis Upchar Karnebabat.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि.२६/०७/२०१८

### ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. :- ४७

विषय : महानगरपालिका क्षेत्रात औषध फवारणी करणेकरीता ठेकेदारामार्फत कर्मचारी घेणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात नोव्हेंबर २०१६ पासून मा. आयुक्त यांच्या आदेशान्वये डास नियंत्रणाकरीता फवारणीचे काम वैद्यकीय विभागाकडे वर्ग करण्यात आले. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य विभागाकडील फवारणी कामगार या विभागाकडे वर्ग करण्यात आले. सन २०१७-१८ या वर्षात सरासरी १८१ ठेक्याचे कामगार फवारणीचे काम करण्यासाठी घेण्यात आले होते व त्यांचा वेतन खर्च "वॉर्ड साफसफाई / नाले साफसफाई" या सार्वजनकि आरोग्य विभागाच्या लेखाशिर्षातून करुन येत होता. तथापी सन २०१८-१९ च्या आर्थिक वर्षासाठी वैद्यकीय विभागाने "एकात्मिक डास निर्मुलन योजना" हे लेखाशिर्ष तसेच फवारणी कामगारांच्या वेतनाची तरतूद सार्वजनिक आरोग्य विभागाकडून वैद्यकीय विभागाकडे वर्ग करण्याची मागणी केली होती व याबाबतचा प्रस्ताव प्रपत्र क्र. ०२ व प्रपत्र क्र. ०३ नुसार मुख्यलेखापरिक्षकांकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावानूसार "एकात्मिक डास निर्मुलन योजना" व "डास निर्मुलन फवारणी कर्मचारी ठोक मानधन" ही दोन स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करुन दोन्हीसाठी प्रत्येकी ६ कोटी असे एकूण १२ कोटी रुपयांची मागणी केली होती. मात्र सन २०१८-१९ च्या मूळ अंदाज पत्रकात ही दोन्ही लेखाशिर्ष एकत्रित करुन "एकात्मिक डास निर्मुलन योजना / ठेका कर्मचारी" हे नविन लेखाशिर्ष तयार करण्यात आले आहे व या लेखाशिर्षात फक्त रु. २ कोटी तरतूद करण्यात आली तथापी मा. स्थायी समिती सभेने त्यामध्ये वाढ करुन सदर तरतूद रु. ३ कोटी केली आहे

सन २०१७-१८ या वर्षात फवारणी कामगारांच्या वेतनापोटी सुमारे रु. ५.५ कोटी खर्च करण्यात आला आहे. सदर खर्च "वॉर्ड साफसफाई / नाले साफसफाई" स या लेखाशिर्षातून करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे चालू वर्षी देखील सदर कामगारांचा वेतन खर्च याच लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. यावर्षी सन २०१८-१९ मध्ये "एकात्मिक डास निर्मुलन योजना / ठेका कर्मचारी" या लेखाशिर्षात सद्यस्थितीत रु.९१ लक्ष तरतूद शिल्लक आहे. सदर तरतूदीमधून औषध फवारणीसाठी जेट स्प्रे टेम्पो, पितळी स्प्रे पंप, साहित्य खरेदी करणेकरीता कार्यवाही प्रस्तावित आहे.

तरी उपरोक्त बाबींचा विचार करता डास नियंत्रण कार्यक्रमाकरीता आवश्यक १८० कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतनानूसार पुढील १ वर्षाकरीता अंदाजे रु.५.७६ कोटी खर्च अपेक्षित आहे.

परंतू अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकानुसार "एकात्मिक डास निर्मुलन योजना / ठेका कर्मचारी" या लेखाशिर्षात तसेच वैद्यकीय विभागाकडे कुठल्याही लेखाशिर्षात तरतूद शिल्लक राहणार नसल्याने इतर विभागाकडून पुनर्विनियोजन करुन मिळणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पुढील ३ वर्षांकरीता निविदा काढणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त १८० कंत्राटी फवारणी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी आवश्यक तरतूद उपलब्ध करुन मिळणेकरीता व सदर कामाची ३ वर्षेकरीता निविदा काढणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेकरीता सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

(श्री. बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २५/७/२०१८ वेळ ९.३०
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. 38
नगरसचिव विभाग.

मिरा भाईंदर महानगरपालिका
विशेष
मा. महासभा दि. -२६/०५/२०१८

## // गोषवारा //

५०
विषय - मिरा भाईंदर महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.

मिरा भाईदर महानगरपालिकेच्या ३६ शाळा असून त्यापैकी इयत्ता १ ते ८ वी चे एकुण पटसंख्येनुसार ७८३४ विद्यार्थी (३६३१) - विद्यार्थिनी (४२०३) शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. यामध्ये सन २०१८-१९ या शैक्षणीक वर्षात संभाव्य वाढ लक्षात घेता एकूण अंदाजे पटसंख्या ८००० पर्यंत अपेक्षित आहे. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनीना शारिरीक गणवेश-टाय सह (प्रत्येकी २), बुट-मोजे, वह्या, बॅग, पाण्याच्या बाटल्या इ. पुरवठा करण्याबाबत महानगरपालिकेचे धोरण आहे. मनपा शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनीना सदर धोरणानुसार सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये सदर साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक तरतूद सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात (अ.क्र.०१) शारीरीक गणवेश-टाय सह (प्रत्येकी २), पीटी युनिफ़ॉर्म संकेतांक (२५३४) रु. ७०,००,०००/- (अ.क्र.०२) शालेय वह्या व इतर साहित्य संकेतांक (२५३४) रु.३५,००,०००/-, (अ.क्र.०३) शालेय दप्तर,बुट,मोजे,वॉटर बॉटल (२५३४) रु.७२,००,०००/- प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सबब साहित्य खरेदी करण्याकरीता मा.महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे. सदर योग्य त्या आर्थिक व प्रशासकीय मंजूरीसाठी सविनय सादर.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
२५/७/18